
# श्री साईलीला



उदी विशेषांक

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

अज्ञान नाशे विषय विमुख ।
होता, होईल उन्मनीं हरिख ।
जीव ज्ञानस्वरुपोन्मुख ।
आत्यंतिक सुख लाधेल ॥९४॥

चित्तें करा हरिगुरू चिंतन ।
श्रवणें करा चरित्र श्रवण ।
मनें करा ध्यानानुसंधान ।
नामस्मरण जिव्हेनें ॥९५॥

चरणीं हरिगुरु ग्रामा गमन ।
घ्राणीं तन्निर्माल्या घ्राणन ।
हस्तीं वंदा तयाचे चरण ।
डोळां ध्या दर्शन तयाचें ॥९६॥

ऐशा या सकल इंद्रिय वृत्ति ।
तया कारणें लावितां प्रीति ।
धन्य तया भक्तांची स्थिति ।
भगवद्भक्ति काय दुजी ॥९७॥

सारांश समूळ अज्ञान खाणा ।
उरे ते ज्ञान सिद्ध जांणा ।
ऐसे या श्लोकांचें इंद्रतं अर्जुना ।
श्रीकृष्ण राणा सूचवी

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ३९ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५९ वे] मे १९८० [अं. २

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. १०–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक १ रु. फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका—मे १९८०


१) संपादकीय — साईबाबांच्या उदीचे चमत्कार
२) चिंचणीचे श्रीसाईमंदिर —
३) सौ. आईसाहेब बंगाळे — सदानंद चेंदवणकर
४) अकल्पीत आधार — सौ. उषा अधिकारी
५) उदी व सुंदर दिसणारी मायावी आकृती — श्री. सदाशिव कुलकर्णी
६) उदी आणि माझी लेक — सौ. शांता सरोदे
७) श्रीसाई उदी आणि गावस्कर — श्री. श्रीराम सातर्डेकर
८) श्रीसाई चरित्रातील उदीओव्या — ले. क. निंबाळकर
९) श्रीसाईबाबांची किमया — सौ. दिपा स. ढापरे
१०) जगाचे महान डॉक्टर—बाबा — श्री. रमेश चव्हाण
११) उदी आणि आशिष — सौ. मंगला वैद्य
१२) बाबांच्या उदीचा महिमा — श्री. डी. के. जाधव मास्तर
१३) आजही श्रीबाबांचे मार्गदर्शन — सौ. लीलाताई गोखले
१४) बाबा धावून आले — श्री. मधुकर मंडलीक
१५) श्रीसाईंची लीला — सौ. रजनी त्रिं. लिमये
१६) उदी आणि माझा कान — श्री. दत्तात्रय दळवी
१७) बाबांच्या उदीची थोरवी — मंजुळा पाठारे
१८) बाबा नवसाला पावले — श्री. तुळशीदास चोपडेकर
१९) भक्ताची ओढ बाबा जाणतात — श्री. दशरथ तळेकर
२०) मी आणि बाबांची उदी — श्री. स. स. देशपांडे
२१) भक्तप्रिय साई — सौ. सुनिता चावक
२२) साईकृपेने पाय बरा झाला — श्री. विजयकुमार चव्हाण
२३) शिरडीचा रामनवमी उत्सव —
२४) शिरडी वृत्त — मार्च १९८०

२५) उदी नव्हे संजीवनी — डॉ. सौ. मालती रहाटे २६) श्रीसाई उदी गीत — श्री. पी. आर. जोशी २७) श्रीसाईबाबांची प्रभावी उदी — श्री. बाळकृष्ण गोरक्षकर २८) उदीची चिमूट — सौ. लीला वनगे २९) साई उदी लगानेसे — श्री. वामन हतागळे ३०) धन्य धन्य झालो साई पावला प्रसाद —श्री. डी. बी.पोतनीस ३१) आरती साईबाबांची — श्री. भालचंद्र टसाळ ३२) संतांची उदी — श्री. ओमप्रकाश बेन्नी ३३) तर्ज— श्री. अनिल लुतडे ३४) साईबाबा सांभाळी — सौ. मालती य. आगाशे ३५ ) साई दर्शन — अशोक बागवे ३६ ) जाते माहेराला, जाते माहेराला — श्रीमती कृष्णाबाई येवलेकर ३७) साई तूच खरा आधार — श्री. सुभाषचंद्र वैष्णव ३८ ) पुस्तक परिक्षण

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# साईबाबांच्या उदीचे चमत्कार

● अखिल जगावर पुत्रवत् प्रेम करणाऱ्या साईबाबांचे आयुष्य म्हणजे चमत्कारांचा एक ग्रंथच होय. परंतु त्यांच्या अंगी असलेल्या विविध गुणांमुळे हे सारे चमत्कार आपोआप घडून येत, आणि विश्वास व श्रद्धा असणाऱ्या कोणाहि भक्तावर ते प्रेमाचा वर्षाव करीत. त्यांचे भक्तांकडे फक्त एवढे मागणे असे की भक्ताने श्रद्धा ठेवावी व आपली मागणी योग्य नि खरी आहे याची स्वतः तपासणी करावी. इतर संतांच्यात नि साईबाबांच्या वागणुकीत असा विशेष फरक होता की, इतर संत आपल्या भक्तांना संतांच्या मागे जाण्यास सांगत, व ऐहिक सुखांपासून माणसाने दूर रहाण्यासाठी सतत उपदेश करत; परंतु सामान्य माणसाने स्वतःला हवी ती सुखे उपभोगावी, त्या सुखामागे सात्विकता असावी, ती सुखे सत्यावर आधारलेली नि न्याय्य असावी, असा श्रीबाबांचा आग्रह असे. ते असे स्पष्टपणे सांगत की तुम्ही माझ्यावर जेवढ्या प्रमाणात विश्वास ठेवाल तेवढ्या प्रमाणात मी तुमच्या इच्छा अवश्य पूर्ण करेन. तुम्ही माझ्यावर संपूर्ण विश्वास ठेवत असाल तर तुमच्या आशा आकांक्षा सर्वांशाने पूर्ण होतील असं ते निक्षून सांगत.

आता उदाहरण म्हणून साईबाबांच्या पुढील भक्तांविषयींच्या प्रेमाची कथा ऐका. खानदेश जिल्ह्यात पूर्वी नानासाहेब चांदोरकर नावाचे एक मामलतदार रहात असत. मोठा कुटुंबवत्सल माणूस. त्याची मुलगी गरोदर होती तेव्हाची ही गोष्ट आहे. तिला दिवस पुर्ण होत आले व प्रसूतिवेदना सुरू झाल्या. प्रसूतिवेदना इतक्या भयंकर होत्या की जणू काळच आमंत्रण घेऊन आलेला. तिचा जीव व्याकुळ झाला होता, व त्याच्याबरोबर तिचे वडीलहि अतिशय बेचैन झाले. त्यांनी साईबाबांची प्रार्थना सुरू केली व मनोमन त्यांना एकसारखे विनंत्या करू लागले. आपल्या मुलीच्या यातना कमी होण्यासाठी त्यांनी धावून यावे, असा एकसारखा धावा त्यांनी चालवला होता. त्याच समयी शिरडीत साईबाबांचा एक निस्सीम भक्त रहात असे. त्याचं मूळ गाव खानदेश जिल्ह्यातीलच. तो शिरडीहून गावाकडे यायला निघाला होता. त्या भक्ताचं नाव रामगीरबुवा. या भक्ताने जाण्यापूर्वी साईबाबांची भेट घेतली.

तेव्हा रामगीरबुवाना बाबांनी सांगतले की जामनेरला जाऊन त्यांनी नानासाहेब चांदोरकरांकडे एकदोन दिवस रहावं. त्यांना उदीची पुडी द्यावी व नंतर त्यांनी गावी जावं.

पण रामगीरबुवांची पंचाईतच झाली. त्यांच्या खिशात केवळ दोन रुपये होते. त्यामुळे त्यांना मोठा पेच पडला. त्यामुळे जामनेरला जाऊन तेथून आपल्या गावी या दोन रुपयात कसं जावं हा एक मोठा पेचच होता. फारफार तर ते दोन रुपये घेऊन रामगीरबुवाना जळगावपर्यंत जाता आलं असतं. पण तेथून टांगा करून जामनेरला जायला, त्यांच्याजवळ पैसे होतेच कुठे ! बाबांनी त्यांना आश्वासन दिले, व जाण्यासाठी आज्ञा केली. शामानं आरती पुस्तक व उदी रामगीरबुवांच्या हाती बाबांच्या आज्ञेवरून दिली, व रामगीरबुवा लगेच जामनेरला जाण्यास निघाले.

रामगीरबुवा बाबांच्या आज्ञेप्रमाणे खिशात दोन रुपये असतानाच निघाले. ते जळगावला पोहोचले, तेव्हा त्यांच्या खिशात फक्त दोनच आणे शिल्लक होते रामगीरबुवा अगदी चिंतित झाले होते. मात्र जळगावला पोहोचताक्षणीच त्यांना आवाज ऐकू आला–'शिरडीहून रामगीरबुवा कोण आले आहेत ?' रामगीरबुवा आश्चर्यचकितच झाले. त्यांनी सभोवताली इकडेतिकडे पाहिले, तों एक शिपाई त्यांना दिसला रामगीरबुवांनी त्याला जाऊन स्वतःच रामगीरबुवा असल्याचे सांगितले.

त्या नोकराने सांगितले की नानासाहेबाने त्यांच्याकरता टांगा आणला असून त्यांचीच तो वाट पहात होता. असे म्हणत त्या नोकरानं त्यांना टांग्याकडे नेले. सकाळ होताच ते जामनेरला आले, घोडे थकले होते. त्यांना तहान लागली होती, म्हणून नोकरानं टांगा थांबवला. रामगीरबुवाही तोंड धुण्यासाठी खाली उतरले. थोडे पुढे जाऊन ते तोंड धुऊन परत आले तो त्यांना परत आणलेला टांगा व त्याबरोबरचा नोकर तेथे हजर नव्हता. टांगा व बरोबरचा नोकर दिसेनासे झाले होते. रामगीरबुवा आश्चर्यचकितच झाले. रामगीरबुवांना काहीच बोध होईना. अखेर त्यांनी नानासाहेब चांदोरकर कुठे रहातात ह्याची पृच्छा करण्यास सुरवात केली. थोड्या वेळाने त्यांना ते घर सापडले. घर सापडताच त्यांनी नानासाहेबांना शिरडीहून आपणाला बाबांनी पाठविले असल्याचे सांगून, त्यांच्याजवळ आरती पुस्तक व उदीची पुडी दिली.

नानासाहेबांनी लगेच सारी हकीगत आपल्या पत्नीस सांगितली व मुलीला उदी देऊन, पत्नीला आरती गाण्यास सांगितले. आपल्याकरिता बाबांनी उदी पाठविल्याचे कळताच नानांना फार बरे वाटले. मुलीला उदी देताच थोड्याच वेळात चमत्कार झाला. मुलीच्या मरणप्राय प्रसूतिवेदना तर कमी झाल्याच, पण ती सुखरूप प्रसूत झाली.

मात्र त्यानंतर रामगीरबुवांनी नानासाहेबांचे स्टेशनवर वेळीच टांगा पाठविल्याबद्दल आभार मानले. नानासाहेब तर आश्चर्यचकित होऊन पहातच राहिले. त्यांनी स्टेशनवर कुणालाच पाठविलं नव्हतं. एवढंच काय, पण रामगीरबुवा येणार हे सुद्धा त्यांना माहीत नव्हतं! त्यामुळे त्यांनी स्टेशनवर कुणाला पाठविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

ही सारी मदत साईबाबांनीच अकल्पितपणे ह्या दोन्ही भक्तांना देऊन त्यांच्यावर आपले प्रेम प्रकट केले होते.

असेच आपल्या भक्तांवरच्या प्रेमाचे चमत्कार त्यांनी अनेक वेळा दाखविले होते. पण ते प्रेम साधण्यासाठी काही गोष्टीची आवश्यकता होती. त्या गोष्टी म्हणजे अशा :—

१) तुम्ही माझ्यावर व माझ्या शब्दांवर संपूर्ण विश्वास ठेवा, आणि मग तुमच्या साऱ्या आशाआकांक्षा सफल होतील.

२) तुम्ही माझ्याकडून कशाचीही मागणी करा. ती मागणी सत्यावर आधारलेली असेल तर मी तुम्हास वचन देतो की मी तुमची मागणी लगेच पूर्ण करेन. माझ्या समाधीतील हाडे तुम्हाला आश्वासन देतील.

३) तुम्ही सत्य सांगत असाल व सत्याला धरून नेहमी वागणार असाल, तर तुमची मागणीं मी सत्वर पुरी करेन.

४) सत्याला धरून जर तुमची वागणूक असेल तर विश्वास ठेवा की तुम्ही कितीही अडचणीत सापडला तरी मी तुमच्यासाठी माझे प्राण पणाला लावेन. तुम्ही कोणत्याहि आपत्तीत सापडला असाल तरी मी तुमच्यासाठी धावून येईन.

५) तुम्ही काहीही मागणें मागा, मी ते पूर्ण करू शकेन. काहीही, परंतु ते मागणें सत्य असू द्या. मग मी वाटेल ती किंमत देऊन पूर्ण करीन. मात्र माझे मार्ग तुम्ही विचारू नका. कारण माझे मार्ग तुमच्या आकलन–शक्तीच्या पलीकडचे आहेत. त्यांचा तुम्हाला थांग लागणार नाही.

६) ज्या क्षणी तुम्ही शिरडीच्या पुण्यभूमीवर पाऊल टाकाल त्या क्षणी तुमच्या शरीरावरची दुःखाची ओझी दूर होतील.

७) माझ्या भक्तांच्या घरात कधीही कपड्यांचा तुटवडा नसेल.

८) असत्याला मी कधीही आधार देणार नाही.

९) तुमच्या साऱ्या काळजांचे ओझे तुम्ही माझ्यावर लादा. तुमच्यासाठी मी त्या शिरावर घेईन.

१०) तुम्ही माझ्यावर भक्ती ठेवा, मी तुमच्याकडे लक्ष देईन.

११) ज्यावेळी तुम्ही माझ्या समाधीच्या पायऱ्या चढाल त्याचवेळी तुमची पूर्वीची सारी पापे धुऊन निघतील.

आणि या गोष्टींच्या चाकोरीतून जाणाऱ्या भक्तांच्या मागणीचा साईबाबा नेहमी प्रेमपूर्वक विचार करून व त्यांच्यासाठी कित्येक चमत्कार करून दाखवीत.

अशा चमत्कारांपैकी श्रीबाबांनी धूनी पेटविली व त्या धूनीतील रक्षा, उदी आज असंख्य साईभक्तांच्या घरोघरी असून तिची जपणूक ते करीत आहेत. रोजचे रोज व वेळप्रसंगी ते उदीचा वापर करीत आहेत. खुद्द श्रीसाईबाबांच्या हातची उदी पण अनेक भक्तांच्या घरी आहे. या उदीने अनेक चमत्कार करून भक्तांना संकटातून तारले आहे, रोगराईतून वाचविले आहे. अशा या उदीच्या भक्तांना आलेल्या अनुभवांचा हा अंक वाचकांना आवडेल असाच आहे. त्याचे ते स्वागत करतील यात शंकाच नाही.

● ● ●

## श्रीसाईनिकेतनची रामनवमी

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर कार्यालयात श्रीरामनवमीचा उत्सव दरवर्षाप्रमाणे थाटात साजरा करण्यात आला. सकाळी ९ वाजल्यापासून श्रीबाबांच्या दर्शनास येणाऱ्या भक्तांची जा-ये सुरू झाली. सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्री.के.के. टिक्कू व सौ. चंद्राबेन भाटे व त्यांच्याबरोबरची गायक कलाकार मंडळी यांनी श्रीबाबांच्या विषयींची भक्तीरस प्रधान हिंदी गीते वाद्यांच्या साथीवर व सूरावर म्हणून भक्तांची करमणूक केली. दुपारी १२ वा. श्रींची आरती श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी केली. त्यावेळी शेकडो भक्त हजर होते. दिवसभरात असंख्य साईभक्तांनी साईनिकेतनमध्ये येऊन बाबांचे दर्शन घेतले व धन्यता मानली.

# चिंचणी ( जि. ठाणे )चे श्रीसाई मंदिर

—डॉ. म. स. बाबरे

१०६, रा. ब. बोले मार्ग, दादर मुं. २८

● चिंचणी हा सुमारे १५ हजार वस्तीचा गाव ठाणे जिल्ह्यात पश्चिमेस समुद्र किनाऱ्यावर असून भात शेती व बागायतीचा आहे इकडून रोज भाजीपाला, फळे वगैरे मुंबई व सुरत बाजूस रवाना होतात. दागिन्यासाठी लागणाऱ्या डाइजचे हे जनन-स्थान आहे. काचेच्या बांगड्यांसाठी हे प्रसिद्ध असून फार पूर्वी येथून बांगड्या जपानला निर्यात होत असत. प्लास्टिकमुळे या धंद्यास सूर्त अवकळा आली आहे. प. रेल्वेच्या पालघर, बोयसर व वाणगाव या स्टेशनावरून चिंचणीस जाण्यास एस. टी. बसेस सुटतात. या येथल्या मंदिराचा थोडा पूर्व इतिहास असा—

चिंचणी येथील कै. दामोदर घनःशाम तथा अण्णा बाबरे ( यांना शिर्डीत अण्णा चिंचणकर म्हणत ) व त्यांच्या पत्नि कै. सौ. लक्ष्मीबाई हे उभयता प. पू. श्रीसाईबाबांचे परम भक्त व एकनिष्ठ सेवक होते. बाबांच्या हयातीत शिर्डीस श्री बाबांच्या जवळ राहून त्यांनी निःस्वार्थ सेवा केली. बाबा समाधी घेण्यापूर्वी शेवटची ५।६ वर्षे तर ही उभयता शिरडीस कायम वास्तव्य करून राहिले होते. त्यांना संतान नव्हते. चिंचणी गावात व आजुबाजूस स्थावर जंगम इस्टेट होती. गुरुसेवेत एक निष्ठता व तन्मयता होती. त्यामुळे पुढे पुढे अभेद भक्तीने ते अगदी बाबामय झाले होते. कै. अण्णा हे १५ एप्रिल १९२० रोजी आपल्या गुरुचरणी विलीन झाले तत्पूर्वीच काही महिने अगोदर सौ. लक्ष्मीआई वैकुंठवासी झाल्या होत्या. बाबा १९ ऑक्टोबर १९१८ ला समाधिस्थ झाल्यानंतर आपले सद्गुरु आपल्या घरी राहावयास यावेत म्हणून घराच्या रहात्या जागेत श्रीसाईबाबा मंदिर व भक्तांसाठी धर्मशाळा बांधणेची त्यांना इच्छा झाली. वृद्धापकाळामुळे त्यांनी तसे मृत्यूपत्र तयार केले व मृत्युपत्रान्वये " अण्णा बाबरे चिंचणकर ट्रस्ट " निर्माण केला व त्यासाठी (१) श्री. कै. हरि सीताराम दिक्षीत, सॉलिसिटर (२) कै. रावबहाद्दर मोरेश्वर प्रधान (३) कै. अण्णा साहेब दाभोलकर (४) कै. लक्ष्मण गोपाळ महाजनी ( काका महाजनी ) व (५) कै. अच्युत नारायण खरे, वकील हे मृत्युपत्राची विल्हे-वाट लावणेसाठी पहिले विश्वस्थ नेमले. कै. अण्णांनी बाबा हयात असतानाच आपले तन, मन, धन श्रीबाबांना अर्पण करण्यास सुरवात केली होती हे माझ्या " बाबांची चावडी " या साईलीला मासिक ( आक्टोबर १९७९ ) मधील अंकातील माझ्या

लेखाने लक्षात येईल. शेवटी सर्व इस्टेट बाबांच्या चरणी अर्पण करून सर्व समर्पणाने गुरुभक्तीचा कळस गाठला कै. देव मामलेदारांनी कै. अण्णांच्या मृत्यूनंतर "साईलीला मासिकात त्यावेळी "तन, मन, धन अर्पण करणारा साईभक्त" म्हणून मृत्युलेख लिहिला होता. अण्णांच्या मृत्यूनंतर विश्वस्यांनी इ. स. १९२३ मध्ये मृत्यूपत्राचा प्रोबेट घेतला. मरण समयी अण्णांना काही कर्ज होते. तो काळ अत्यंत मंदीचा होता. त्यामुळे अण्णांच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम झाला होता कर्जफेड झाल्यावर मात्र अण्णांचे इच्छे प्रमाणे श्रीसाई-मंदिर व धर्मशाळा बांधणेस हळूहळू सुरवात झाली. ती पूर्ण होऊन शके १८७० वैशाख शु. ७ इ. स. १९४९ या शुभदिनी श्रीबाबांच्या ३१ इंची संगमरवरी मूर्तीची व शिव-लिंगाची प्राणपतिष्ठा झाली. म्हणून दरसाल वैशाख शु. ७ व ८ या दोन दिवशी तिथे उत्सव होतो.

मंदिर वर्णन–चिंचणी ब्राह्मण आळीत राजरस्त्यावर पूर्व पश्चिमाभिमुखी हे मंदिर आहे. मंदिरास कळस नाही. सभामंडप लहान आहे. पण मंदिराच्या पिछाडीस व धर्म शाळेस लागून व समोर विस्तीर्ण जागा आहे ती ट्रस्टचीच आहे. मंदिरात पगारी पुजारी असून सकाळ संध्याकाळ पूजा, अर्चा व आरती होत असते. गुरुवारी नित्य नियमित कार्यक्रमा व्यतिरिक्त भक्तांच्या पूजा, एकदशणी, अभिषेक वगैरे असतात. गुरुवारी पूजा आरतीच्या वेळी व संबंध दिवस भक्तांची हजेरी मोठ्या-प्रमाणावर असते. वार्षिक उत्सवाच्यावेळी नित्य कार्यक्रमांखेरीज बाबांना महारुद्राभिषेक होतो. त्या दिवशी भक्तांना विनामूल्य भोजनप्रसाद पूर्वी असे तो आता विद्यमान विश्वस्थांनी बंद करून महाप्रसादाची प्रथा चालू केली आहे. दोन दिवस रात्री पुणे मुंबई येथील प्रसिद्ध ह. भ. प. कीर्तन करांचे कीर्तन होते. दिवसे दिवस भक्तांची हजेरी वाढत चालल्यामुळे मंदिराचा विस्तार करून सभामंडप मोठा कर-णेचा विश्वस्थांचा विचार आहे. अशाप्रकारे भक्तांच्या इच्छेनुसार आज त्यांच्या रहात्या जागेत श्री. सद्गुरु सच्चिदानंद साईनाथ विराज मान झाले आहेत. शिरर्डी संस्थानाशी निगडीत असे हे साईमंदिर आहे.

कै. अण्णांनी पहिले नेमलेले विश्वस्थ हे अण्णांचे समकालीन परमसाईभक्त होते. त्यावेळचे शिरर्डी संस्थानचे विश्वस्थ व अण्णा बाबरे चिंचणकर ट्रस्टचे पहिले विश्वस्थ एकच असल्याचे दिसून येईल. एवंच चिंचणीचे साई मंदिर हे शिरर्डी संस्थानशी निगडीत आहे याचा आम्हा बाबरे कुटुंबियांना अभिमान वाटतो.

# क्षणभरात हवेतून उदी निर्माण करणाऱ्या सौ. इंदिरा आईसाहेब बंगाळे

—सदानंद चेंदवणकर
का. संपादक श्रीसाईलीला



सोमवार ता. २४ मार्च १९८० रोजी रामनवमीच्या सुमुहूर्तावर 'समर्थांचे महानिर्वाण' या सद्गुरू श्री भालचंद्र महाराजांवर प्रकाशित होणाऱ्या एका अध्यात्मिक ग्रंथावर भाषण करण्यासाठी म्हणून मला 'समर्थांचे अखेरचे महानिर्वाण' जिथे झाले त्या लालबाग येथल्या जागेत आमंत्रित करण्यात आले होते. समर्थांचे परमभक्त व मुंबापुरीचे माजी महापौर श्री. वामनराव महाडिक सभेच्या अध्यक्षस्थानी होते. अनेक मान्यवर मंडळी व्यासपीठावर अधिष्ठीत होती. माझ्या शेजारीच एक गौरकाय तेजस्वी महिला बसल्या होत्या. त्यांची ओळख मला करून देण्यात आली. "या आहेत सौ. आईसाहेब" यापेक्षा अधिक काही नाही. मी माझं भाषण कार्य आटोपलं व पूर्ववत आपल्या जागेवर येऊन बसलो. पण इतक्यातच लगतच्याच खुर्चीवर बसलेल्या सौ. आईसाहेबांनी हवेत पंजा भिरकावला. मला वाटलं की असेल डास मच्छर, माशी काहीतरी पण छे! बघतो तो काय! चांगली घळ घळ घळ पसाभर सुगंधी उदी त्यांच्या मूठीतून वाहू लागली. काही उदी तर माझ्या कपड्यांवर पडली, आणि हे सगळे होत असतानाच प्रेक्षकांत एकच खळबळ उडाली. श्रोत्यांनी व्यासपीठावर धाव घेतली. शेकडोंनी त्या उदीचा लाभ घेतला. तसबिरीतून उदी निघते, हवेत हात भिरकावून उदी काढणारी काही सिद्धमंडळी आहेत पण प्रत्यक्ष पहाण्यात मात्र काहीच नव्हते. आज मात्र सौ. आईसाहेबांनी हा चमत्कार डोळ्यासमोर दाखविला मात्र.

उदीचा हा असा चमत्कार दाखविणाऱ्या सौ. आईसाहेब या मूळ वाईच्या. पूर्वाश्रमीच्या त्या कु. इंद्रायणी चौगुले. त्यांचा जन्म १९२७ सालच्या दिवाळीच्या अमावास्येचा. त्यांचे वडील विष्णूपंत हे ब्रह्मचैतन्य महाराजांचे शिष्य व मातोश्री गोदावरी यांनी समर्थ चौंडे महाराजांना आपले गुरु केले होते. छोट्या इंद्रायणींचे शिक्षण वाईलाच झाले. इंग्रजी चौथीपर्यंत त्या रावसाहेब पंडितांच्या हिंदु हायस्कूलच्या विद्यार्थीनी, पुढे पाचगणीच्या संजिवनी विद्यालयात त्यांनी इंग्रजी पाचवीत प्रवेश केला खरा पण त्याचवर्षी म्हणजे १९४० साली त्यांच्या विवाहाचा योग जुळून आला व कु. इंद्रायणी चौगुले या सौ. इंदिरा बंगाळे म्हणून वावरू लागल्या. त्यांचे यजमान श्री. नारायण शंकर बंगाळे हे बी. ए. पदवीधर असून मुंबई हायकोर्टात सुपरिटेंडेंट पदावर होते. काही महिन्यापूर्वीच ते सेवानिवृत्त झाले आहेत. अरुण व सुनील असे दोन पुत्र आईंना असून ते चांगले सुविद्य असून एअर इंडियामधे नोकरीस आहेत.

सौ. इंदिरा आईसाहेबांचा लहानपणापासूनच भक्तीमार्गाकडे ओढा. देवाची पूजा अर्चा त्या मनापासून करीत, स्तोत्र, अभंग, आरत्या त्यांच्या अगदी मुखोद्गत होत्या. तुळजापूरच्या भवानी देवीच्या त्या परमभक्त. पुढे पुढे तर त्या देवीच्या एकनिष्ठ उपासक झाल्या इतक्या की देवीच्या ध्यानाशिवाय त्यांना काहीच सुचेना याचाच परिणाम म्हणजे की काय ध्यानावस्थेत असताना त्यांच्या दर्शनासाठी भाविकांची व अनाथ अडीअडचणीत सापडलेल्यांची त्यांचेकडे गर्दी होऊ लागली. देवीच्या कृपाप्रसादानेच की काय अनेक संकटग्रस्तांच्या अडीअडचणी त्या यशस्वी सोडवू लागल्या. अनेक व्याधी पिडीतांवर त्यांनी उपाय सुचविले की त्या रुग्णाला आराम वाटलाच पाहिजे असे होऊ लागले. तुळजाईप्रमाणे सौ. आईसाहेब श्रीसाईबाबांची पण भक्ती करू लागल्या. शिरडीला माजी कोर्ट रिसिव्हर श्री. पोतनीस साहेबांच्या कारकिर्दीत झालेल्या एका चोरीच्या प्रकरणाचा तपास लावण्यात सौ. आईंचाच मोठा वाटा आहे असे जगजाहीर सांगितले जाते. दर शुक्रवारी तर आईंच्याकडे तुफान गर्दी होते. रात्री दहा वाजेपर्यंत तर भक्तांची सुटकाच होत नाही इतकी तोबा गर्दी होते. आईसाहेबांच्या अंगात संचारलेल्या देवीच्या वाऱ्याने अनेकांना व्याधी मुक्त केले आहे. जमिनी जुमल्याचा प्रश्न असो, मुला मुलींच्या विवाहाचा प्रश्न असो, रोग्यांच्या विविध व्याधींचे प्रश्न असोत सौ. आईसाहेब त्यावर उपाय तोडगा सुचवितातच. त्यांच्या हाताला, वाणीला आणि सेवेला असाच गुण येतो आणि त्यांची श्रीतुळजाईची भवानी देवीची व श्रीसाईंची भक्ती आणखीन वाढो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

☆ ☆ ☆

बाबांनी कौमुदीला दिलेली ती पुडी

# ........अकल्पित आधार........

—सौ. उषा प्र. अधिकारी

सावित्री भुवन बंदर रोड, रत्नागिरी.

● सकाळची १०–१०॥ ची वेळ. गेले १५ दिवस तापाने आजारी असलेली कौमुदी आपल्या डॉक्टर भावाची चंदूची वाट पहात होती. लहानपणीच आईवडील गेल्यामुळे वयाच्या १५ व्या वर्षापासून गेली २०–२१ वर्षे अपार कष्ट करुन चंदू नंदू हे दोघे भाऊ व सुषमा प्रतिमा या दोन बहिणीना तिने लहानाचे मोठे केले होते. दोघी बहिणी पदवीधर झाल्या त्यांना नोकरीत न गुंतवता त्यांचे विवाह करून दिले. नंदू चंदूची हुषारी लक्षात घेऊन नंदूला इंजिनिअर तर चंदूला डॉक्टर केले. चंदू मुंबईत एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये अनुभवासाठी नोकरी करीत होता. नंदूही मुंबईतच एका कंपनीत इंजिनिअर होता. दोघांचीही लग्ने झाली होती. सुषमा प्रतिमांची तर कौमुदीने २।२ बाळंतपणेही केली होती. वयाच्या १९ व्या वर्षी एका हायस्कूलमध्ये तिने नोकरी पत्करली. आई गेली पाठोपाठ बाबा गेले. मात्र बाबांचा थोडा विमा मिळाला होता. पण ही चार चिमणी पाखरे वाढविणे सोपे नव्हते. कौमुदी रोज पहाटे ५ ला उठे सर्वांचे जेवण करुन सकाळचे कॉलेज करी. काही तासांना हजर राहून घरी येऊन सर्वांना जेवण वाढून दोन घास खाऊन शाळेत जाई ती ६ ला घरी येई. एकीकडे स्वयंपाक करावा. एकीकडे मुलांना शिकवावे रात्री वह्या पेपर तपासावे ११ ला अंथरूणावर पडावे. दिवसभर कष्ट होते. तरी कधी साधे डोके दुखले नाही की ताप जाळ आला नाही. भावंडांची मात्र जीवावरची दुखणी काढावी लागली होती. कौमुदीच्या मनात आले की माझी रक्तामांसाची भावंडे जवळ असता आपण कधीही आजारी पडलो नाही आणि आज एकाकी अवस्थेत असताना हा ताप आपली पाठ सोडत नाही. लिहवत नव्हते तरी सर्व भावंडाना तिने पत्र पाठवून आपला आजार कळवला होता. तिला वाटले आपले पत्र पोचण्याचाच अवकाश आपल्या ताईसाठी सगळी धावून येतील पण प्रत्यक्षात उलटे घडले होते. नंदूच्या मेहुण्याच्या नव्या घराचा वास्तुशांती समारंभ औरंगाबादला होणार असल्याने नंदू सपत्नीक तिकडे जाणार होता. सुषमाची नुकतेच लग्न झालेली एकुलती एक नणंद माघारपणाला आली होती. प्रतिमा आपल्या पतीबरोबर दिल्लीला ट्रिपला जायची होती. सर्वांची पत्रे एकामागोमाग येऊन थडकली होती. सर्वांनीच दिलगिरी व्यक्त केली होती. आता गरज संपली

होती. बिचारी कौमुदी ! आज चंदू तरी नक्की येईल असे तिला वाटत होते. तो डॉक्टर असल्याने आयुष्यात पहिल्यांदाच इतकी आजारी पडलेल्या आपल्या ताईच्या आजाराची गंभीरपणे दखल घेईल असे तिला वाटले. इतक्यात खिडकीतून पाकीट टपकन् टाकून पोस्टमन निघून गेला, ती उठली. कसेबसे जाऊन तिने पत्र उचलले न फोडताच तिला त्यातला मजकूर ओळखता आला होता. चंदूचाही नकार असणार हे तिला समजले. खरोखरच चंदूच्या एका मित्राचे मेजर ऑपरेशन असल्याने तो येऊ शकत नव्हता. त्याने त्याबद्दल ताईची क्षमा मागितली होती व एखादी बाई देखभाल करावयास ठेव मी पैसे पाठवीन असे लिहिले होते. कौमुदीला रडे आवरेना...ती म्हणाली चंद्या अरे मोलाने ठेवलेले माणूस का माझी मायेने सेवा करणार ? तसे असते तर मी लिहवत नव्हते तरी तुम्हाला पत्र पाठवून कसे बोलावले असते ! जगात कुणी कुणाचे नाही हेच खरे. अरे तुम्हा चौघांना हाताचा पाळणा करून वाढविले. नोकरी केली. तुमची हौस पुरवली एक धंदा कधी करून दिला नाही. फक्त तुम्हाला जन्म दिला नाही एवढेच. नात्याने ताई पण कर्तव्याने आई सारखे केले. स्वतःचे सुखाचा विचार केला नाही. बुद्धिमत्ता, रूप, गुण असताही केवळ तुमच्यासाठी अविवाहित राहिले. त्याचे हेच काय बक्षिस ? उशीरा का होईना आज मला कळले की जगात ज्याचा तोच. कौमुदी रडू लागली. आधीच तापाने अशक्त झालेले तिचे दुबळे शरीर आणखीनच विकल झाले. अश्रूंच्या सरी मुक्तपणे गालावरून ओघळत होत्या पण त्या तिने थांबविल्या नाहीत. एका दृष्टीने मन हलके होईल तर बरेच असे तिला वाटले. तिने आपले शरीर कॉटवर कसेबसे लोटून दिले. इतक्यात दारावर थाप पडली. कोण यावेळेला त्रास द्यायला आले या विचाराने तिच्या कपाळावर एक सूक्ष्म आठी पडली. डोळ्यावरून हात फिरवून ती कशीबशी दाराकडे गेली. नाखुषीनेच तिने दार उघडले. दारात एक म्हातारा उभा होता. अंगावर पांढरे शुभ्र पण काही ठिकाणी फाटलेले कपडे होते पण त्याचे मुख इतके प्रसन्न होते की 'तू पुढे जा' असे कौमुदीला म्हणवेना. ती हलकेच मागे झाली. म्हातारा सरळ आत आला एक हाताने दार घट्ट लोटून दुसऱ्या हाताने त्याने कौमुदीचा हात धरला व सरळ तिला तिच्या कॉटवर आणून बसवले. त्याच्या हाताचा तो मृदू स्पर्श तिच्या कढत अंगाला होताच कौमुदीला आपल्यात काही बदल होत आहे असे वाटले. तिने आपला हात त्याच्या हातातून काढून घ्यायची मुळीच घाई केली नाही. तिच्या हातावर प्रेमाने थोपटत म्हातारा म्हणाला, "बेटी, मला फार भूक लागलीय. अग १२ वाजले. तुझ्या शांताबाईने मऊ भात करून ठेवलाय तो एका थाळीत आण बघू. सोबत लिंबू लोणचे पण आण बेटी. आपल्या मोलकरणीचे शांताबाई हे नाव आणि तिने केलेला मऊ भात याला कसा कळला

हे कौमुदीला समजेना. पण काही न बोलता ती अलगद स्वयंपाक घरात गेली पटकन् गॅसवर भात गरम करून ताटात घातला दोन लोणच्याच्या फोडी घातल्या व ताट त्याच्यापुढे ठेवीत ती म्हणाली, " घ्या आजोबा. फार भूक लागलीय ना. पण आज तुम्हाला दुसरं वाढायला काहीच नाही, आणि करायची ताकद नाही. हा ताप माझी पाठ सोडत नाही हो ! आजोबा प्रसन्नपणे हसले आणि म्हणाले, " कौमुदी, बाळ काही वाटून घेऊ नकोस आज मला भातच हवाय. मी आनंदाने खाईन हं. " भाताचे भराभर घास घेऊन तो संपताच ते परत म्हणाले, " बेटी पातेलीत अजून भात शिल्लक आहे तो घेऊन ये आणि लोटाभर पाणी पण आण. कौमुदी मुकाट्याने आत गेली व भात आणि पाणी घेऊन आली. सर्व भात जेऊन पेल्यात थोडे पाणी काढून ठेऊन आजोबांनी संबंध लोटा रिकामा केला. कौमुदीला जवळ बसवून तिच्या पाठीवर प्रेमाने थोपटत आपल्या कफनीच्या खिशातून एक पुडी काढली आणि ती पेल्यात ओतली आणि ते म्हणाले," बेटा हे पिऊन टाक. तुझा ताप कुठल्याकुठे पळेल. काळजी करू नको बाळ. घे, कौमुदीने कसलाही विकल्प मनात न आणता ते पटकन् पिऊन टाकले. आजोबा हसले. कौमुदीच्या मुखावरून आपला मऊ तळवा फिरवत ते म्हणाले बाळ, तुझी माझी आजचीच ओळख नाही. फार पूर्वीपासून तुझी आई, बाबा, तू, तुझी भावंडे या सगळयांना मी जाणतो. तुम्ही पाची भावंडे लहान असताना तुम्ही सर्वजण माझ्याकडे आला होतात. तेव्हा तुमच्या आईने तुम्हा भावंडाना माझ्यावर सोपवले होते. त्यानंतर त्या दोघांनी तुझ्या आई वडिलांनी या जगाचा निरोप घेतला. तू अकाली प्रौढ झालीस. नोकरी शिक्षण घेतलेस. मुलांचा चांगला सांभाळ केलास. त्यांचे शिक्षण लग्न कार्य सर्व केलेस. आपले कौमुदी हे नाव शीतल चांदण्यासारखे शीतलता देऊन सार्थ केलेस मी हे सर्व दुरुन बघत होतो. तुझ्या आईला वचन दिल्याप्रमाणे तुमची काळजी घेत होतो. अखेर सगळी भावंडे उत्तम तऱ्हेने नोकऱ्या वगैरे मिळवून दूर गेली ' आणि आज तू एकाकी पडलीस. मला हे दिसल्यावर मी दूर कसा राहू ? तुला एकटे ठेवायचे मग मी कशाला पाहिजे ? आज आपणहून मी हजर झालो. आता तू काळजी करू नकोस. मागील अनेक जन्मातील काही जन्मात या तुझ्या भावंडानी तुझी सेवा केली होती. त्यांचे ऋण फेडून तू या जन्मात मुक्त झालीस तेव्हा मी त्यांचे केले आणि ती सारी मला विसरली याचे दुःख करु नकोस, आणि मी केले–केले असा अभिमानही बाळगू नकोस. त्यांनी जसे तुझे केले तसेच तुही एकाचे अगदी जीवाभावाने मागील एका जन्मात केले आहेस. ते तुझे ऋण फेडायला, तुझ्यासारखेच सर्व बहिण भावंडाचे करून आता एकाकी पडलेला सदानंद रानडे तुझा शोध घेत आपणहून तुझ्याकडे येईल. नावाप्रमाणेच तो सदा आनंदी असतो. तो तुला अगदी लायक आहे. त्याला नाही म्हणू नकोस. तुला

तो काही कमी पडू देणार नाही आणि त्याच्या सहवासात राहून पश्चात्ताप करण्याची पाळी तुझ्यावर कधीच येणार नाही याची मला पूर्ण खात्री आहे. तुझी भावंडे आता त्यांना पंख फुटले. पंख फुटलेले पाखरू आपल्या घरट्यात परत येते का? तसेच त्याचे त्यांच्या आकांक्षा त्यांचे बेत वेगळे आता हे त्यांचे वयच आहे, तेव्हा तू त्याचा विषाद मानू नको दुःख करू नकोस. माझे बोल कदापी खोटे झालेले नाहीत होणार नाहीत त्यावर तू निश्चित मनाने विश्वास ठेव. आणि हे बघ मला आता तू भात वाढलास ना तसा भात ४।५ दिवस तरी जेऊ नको. गरम पाणी चहा, ताजे ताक घे आणि ही आणखी पुडी घे. त्यातील थोडी पाण्यात टाकून पोटात घे व मी लावतो अशी कपाळाला लाव. आजोबांनी पाची बोटांनी पुडीत हात बुडवला व कौमुदीच्या कपाळावर अंगठा व मस्तकावर चारी बोटांनी दाब दिला. आपला मऊ हस्त पुन्हा तिच्या मस्तकावर व पाठीवर प्रेमाने फिरवीत ते उठले आणि म्हणाले, "आता मी येतो हं बाळ आता तू बरी होशील आणि तुझे अगदी कल्याण होईल. ज्यावेळी तुला माझी गरज भासेल तेव्हा मला हाक मार म्हणजे असेन तिथून मी तुझ्यासाठी धावत येईन" पण आपल्याला कोणत्या नावाने हाक मारू आजोबा? दरवाजात गेलेले आजोबा हसले आपल्या खिशातील मूठभर बकुळीची फुले त्यांनी कौमुदीच्या दिशेने फेकली आणि क्षणार्धात बाहेर पडून दिसेनासे झाले. कौमुदीने जमिनीवर पडलेल्या फुलांच्य दिशेने पाहिले तो फुलांची अक्षरे तयार झाली होती "साईबाबा." त्या चिमुकल्य खोलीत तेजस्वी प्रकाशाचा झोत पडला होता आणि एक मृदू मधुर गंध दरवळत होता. आपली काया त्या अक्षरांपाशी लोटून देत कौमुदी म्हणाली, बाबा तुमची भक्ती न करताही तुम्ही मला दर्शन दिलेत. केवढी मी भाग्यवान! मला कुणी नाही असं कसं म्हणू मी! तुम्ही असे पाठीशी उभे राहिल्यावर आता काळजी तरी कसली? तुम्ही सांगितल्या प्रमाणेच मी वागेन त्या येणाऱ्या पाहुण्याची वाट पाहीन आणि बाबा, बाबा मी तुम्हाला माझ्या हृदय सिंहासनावर कायमचं अंकीत करीन, निरंतर स्मरण करीन, आज आताच मी मनाने व शरीराने पूर्ण बरी झाले आहे.

● ●

## श्री. पांडूरंग शहाणे साईचरणी विलीन

डोंबिवलीचे श्री. पांडूरंग शहाणे यांचे दीर्घ मुदतीच्या आजाराने गेल्या महाशिवरात्रीला दुःखद निधन झाले. गेले ३१ वर्षे ते साईबाबांचे भक्त होते. ते वारंवार शिरडीस जात असत त्यांच्यामागे त्यांची पत्नी, एक मुलगा-सून एक मुलगी विवाहित दोन नातू. जावई व नात असा परीवार आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांति देवो......

# उदी व सुंदर दिसणारी मायावी आकृति

—श्री. सदाशिव गणपत कुलकर्णी, दादर

● आजच्या विज्ञानयुगात भूतपिशाच्च वगैरे सारख्या गोष्टींवर लोकांचा विश्वास बसणार नाही. ते स्वाभाविकही आहे. सध्या जग पुढे जात आहे. लोक चंद्रावर मंगळावर जाऊन येत आहेत नवनवीन वैज्ञानिक शोध लागत आहेत. केले जाणारे प्रयोग यशस्वी होतात. इतकेच काय विज्ञानयुग हे मुलाचे मुलीत व मुलीचे मुलात रुपांतर करण्याइतपत पुढे जात आहे. तरीसुद्धा हे सर्व मान्य करून देखील प्रत्यक्ष अनुभवानंतर भूत, पिशाच्च व अद्‌भूत शक्तीवर विश्वास ठेवणे काही वेळेस भाग पडते. अर्थात्‌ ह्या ठिकाणी मी माझा प्रत्यक्ष अनुभव कथन करतो.

तो २१ डिसेंबर १९७७ चा दिवस अमावास्येचा. दिवसभर बोअर झाल्यामुळे सिनेमाला जाण्याचा बेत केला. त्यावेळी मुंबईच्या मेट्रो टॉकिजला "सायको" नावाचा इंग्रजी चित्रपट लागला होता. परंतु जाण्यापूर्वी जेवण झालेले नसल्यामुळे चित्रपट सुटला त्यावेळी रात्रीचे १२-१५ वाजले होते. त्यामुळे आम्ही तेथल्याच एका हॉटेलमध्ये फराळ केला व निघालो. त्यावेळी साधारण एक वाजून पाच मिनिटे झाली होती. आम्ही तेथून बस थांब्यापाशी आलो. तो शेवटची बस थांब्यापाशी न थांबता तशीच सरळ निघून गेली होती. मग आम्ही पायीच जाण्याचा बेत केला. कारण त्यावेळेस ट्रेनही मिळण्यासारखी नव्हती. चालत चालत आम्ही वरळी नाक्याजवळील स्मशानभूमीपर्यंत येऊन पोहोचलो. आम्हाला इकडे स्मशानभूमी असेल वगैरे काहीच कल्पना नव्हती. संपूर्ण रस्ता निर्मनुष्य होता. माझ्यासोबत माझे मित्र विश्वनाथ चव्हाण व गोट्या मोरे होते. त्यावेळी अचानक आम्हाला एक मुलगी दिसली. तशी ती सुंदर स्कर्ट ब्लाऊज परिधान केलेली, एक वेणी घातलेली, सुडौल बांध्याची, साधारण उंचीची, वर्ण अगदी गोरापान जेणेकरून कुणालाही मानसिक वेड लावणारी व मोहीत करणारी ती दिसताच तिघांच्याही मनात विचार आला की एवढ्या अपरात्री ही एकटी युवती कुठे चालली असेल. भयाण काळोख आणि काळोखात लखलखणारी सुंदर युवती.

इतक्यात ती मुलगीच जवळ येऊन म्हणाली, 'मला तेथ पर्यंत सोबत करता का ? मला भिती वाटते.' स्वाभाविकतेने तिघांच्या मनात भूतदया जागृत झाली आणि सोबत करण्याची मान्यता क्षणाचाही विलंब न करता दिली. ती मुलगी आमच्या सोबत चालत होती. इतक्यात पाठीमागून एक टांगा भरधाव वेगाने आला

व ती मुलगी थोडीशी बाजूला सरकल्यामुळे तो टांगा दोघांच्या मधून पुढे गेला. परंतु टांगा आमच्या पासून पुढे जाताच त्याचे एक चाक तुटून ते घसरत आमच्या बाजुने आले. आणि तो टांगेवाला आमच्याच बाजूने येत होता. तत्पूर्वी ते चाक आम्हीं उभे करुन काही तुटले का म्हणून त्या चाकाकडे पहात होतो. परंतु त्याचवेळी त्या चाकापलिकडे ती मुलगी न दिसता आम्हांला तिचे पाय उलटे व समोरचा भाग दिसला, आणि मित्र काही म्हणणार इतक्यात उलट्या पायाची अक्राळ विक्राळ आकृति दिसताच तो भयानक भितींने जोरात किंचाळला भु ऽ भू ऽ... त ऽऽ भू ऽऽ त इतक्यात मी बाबांचा ( साईबाबा ) धावा मनात सुरु केला माझ्या मित्रांची. तर घाबरगुंडी झाली. अर्थात बाबांची कृपादृष्टी असल्यावर व बाबा ( साईबाबा ) पाठीशी असताना भिती ही कसली. मी त्या दोघांना धीर दिला, व तेथून बेंगॉल केमिकल पर्यंत धावत येऊन टॅक्सी पकडली ( हे दोघे धावत असल्याने मलाहि धावणे भाग होते. ) व त्या दोघांना आपआपल्या घरी पोहचवून नंतर मी घरी आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी सहज म्हणून मी ९-१५ ला चव्हाणच्या घरी गेलो पहातो तर तो तापाने फणफणत होता, ताप १०३ फॅ इतका होता. मी माझ्या घरी जाऊन साईबाबांची उदी घेऊन आलो. थोडी उदी पाण्यात टाकून उदीमिश्रित पाणी ( तीर्थ ) त्यास प्यावयास दिले, व थोडी उदी कपाळास लावली.

संध्याकाळ पर्यंत त्याला घाम येऊन ताप उतरला व बरा झाला. नंतर तोही बाबांचा भक्त झाला. साईबाबांनी सांगितलेच आहे की–जो जो मज भजे जैसा जैसा भावे. तैसा तैसा पावे मीही त्यासी; त्यानंतर पुन्हा कधी त्याला ती मायावी आकृति दिसली नाही ही बाबांचीच कृपा !


## श्रीसाईलीला

### जून १९८० अंक-खास निबंध विशेषांक

● श्री बाबांच्या साठाव्या पुण्यतिथी निमित्य आम्ही एक निबंध स्पर्धा दोन वर्षापूर्वी आयोजित केली होती. त्या स्पर्धेत अनेक लेखक भक्तांनी आपापले निबंध पाठविले होते. त्यापैकी चार निबंध बक्षिस पात्र ठरून ते आम्ही प्रसिद्धही केले होते. बक्षिसपात्र न ठरलेले पण वाचनीय असे काही निबंध श्रीसाईलीला पुढील अंकातून प्रसिद्ध करीत आहोत. यामुळे जूनचा अंक म्हणजे श्रीबाबांच्या वरील साहित्याने भरगच्च, वाचनीय व संग्राह्य असाच ठरणार आहे.

# उदी आणि माझी लेक

—सौ. शांता अंबाजीराव सरोदे
उल्लेंगल बि. नं. ६ खोली नं. १०
एन्. सी. केळकर रोड दादर मुं. २८

● जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस । मागे जे जे त्यांस तें तें लाभे । श्री सद्‌गुरु साई माऊलीचे हे वचन आम्हा सर्व साईभक्तांना वेळोवेळी अनुभवास येते. आणि असाच एक गोड अनुभव आमच्या कुटुंबात श्रीदयाळू साईमातेने दाखविला दळावयाच्या जात्याचा खुंटा ठोकून ठोकून घट्ट बसविल्यावर पीठ कसे झर झर बारीक लवकर पडते. तशी आपली श्रद्धा श्रीसाई मायवर घट्ट पकडून ठेवल्यावरच आयुष्यातले काही त्रासदायक प्रसंगसुद्धा श्रीबाबांच्या कृपाशिर्वादाने आपण पार पाडतो. असाच एक अनुभव.

श्रीसाईनाथांच्या आशिर्वादाने गेल्या वर्षात दोन्ही मुलींची लग्ने झाली. त्यात धाकट्या मुलीला दिवस गेले. आम्ही सर्वजण आनंदीत झालो. डॉक्टरांकडे अधून मधून तपासणीसाठी मुलीला घेऊन जात होतो. मध्येच डॉक्टरांना शंका आल्यामुळे मुलीचा फोटो काढला. त्यात बाळंतपणाच्या वेळेला ऑपरेशनची शक्यता असल्याचे समजले आणि फोटो काढण्याच्या वेळेस नेमकी मी मोठ्या मुलीला व जावयाबरोबर शिर्डीस श्रीबाबांच्या दर्शनास गेले होते. त्यामुळे मला इकडची बातमी काही माहीत नव्हती. मुक्काम दोनच दिवसाचा शिर्डीचा होता. तरी सकाळी श्रीसाईबाबांच्या समाधीचे अभिषेक घेताना मनातून प्रार्थना केली. मुलीचे बाळंतपणाचे दिवस पूर्ण भरत आलेत. तरी हे तिर्थ, उदी घेऊन जात आहे. आपणच सुटकेच्यावेळी हजर राहून तिला निर्विघ्नपणे पार पाडून मोकळी करा व बाळ बाळंतीण सुखी ठेवा. असा आशिर्वाद मागून दर्शन पुजा अर्चा करून मुंबईस परतलो. शिवाय शिरडी साई दर्शनाची सफर त्यावेळी अचानक ध्यानी मनी नसताना घडली त्यामुळे मला विशेष आनंद झाला होता.

इकडे मुंबईस आल्यावर कळले. की ऑपरेशन करण्याची दाट शक्यता आहे. आता काय करावयाचे ? 'देवा पहिले बाळंतपण एवढी दया कर तुझे तीर्थ, उदी दिवसातून तीनवेळा मुलीला देते. व पोटाला लावते. बिना ऑपरेशनने सुटका कर. हा अनुभव साईलीलेत देते. याप्रमाणे त्यांची करूणा भाकली, व श्रद्धा, सबूरीने नामस्मरण करीत आशेने वाट पहात बसले.

आणि खरोखरच आठ दिवसानी मुलगी सुखरूपपणे बिना ऑपरेशनने श्रीसाईबाबांनी तिला मोकळी केली. थोडासा त्रास झाला हाती पायी सुखी सुटली. कन्यारत्न झाले, बाळ बाळंतीण सुखी आहे. श्रीबाबांना सांगितल्याप्रमाणे हा गोड अनुभव लिहित आहे. त्यांचे उपकार आम्हा कुटुंबावर अगणित आहेत. त्यांची फेड ह्या देहाच्या चामड्याचे जोडे करून त्यांच्या पायात घातले. तरी ते फिटणार नाहीत. म्हणून ही प्रार्थना त्यांच्या चरणी म्हणते, व नम्र आदराने मस्तक ठेवते. दोन हात एक माथा। स्थैर्य, श्रद्धा, अनन्याता। न लगे दुजे साईनाथा। एक कृतज्ञता ने व्हावी।


## साईलीला मासिक जाहीरात दर

साईलीला मासिकात (इंग्रजी-मराठी) छापले जाणारे जाहीरातीसाठी खालील प्रमाणे दर एप्रिल ८० पासून आकारण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) मलपृष्ठ २, ३ व ४ | पूर्णपान | रु. १००-०० |
| २) आतील मजकूराचे | पूर्णपान | रु. ७५-०० |
| ३) आतील मजकूराचे | अर्धे पान | रु. ४०-०० |

जाहिराती सलग ६ महिन्यासाठीही स्वीकारल्या जातील.

क. हि. काकरे

कोर्टरिसिव्हर

# श्री साई ऊदी आणि गावस्कर

—श्री श्रीराम सातर्डेकर,
१८।२ विजित निवास, परळ मुंबई–१२.

● अगदी अलीकडची गोष्ट आहे आणि तिही एका जगत् मान्य क्रिकेटीयरची !

मुंबईचा पाकीस्तान विरुद्ध क्रिकेट सामना भारताने जिंकल्यावर कानपूरचा सामना अनिर्णित राहीला. पाकीस्तान संघ बंगालमध्ये गेला. विश्रांतीनंतर मद्रास-मध्ये ५ वा कसोटी सामना होता. त्यावेळी पाकीस्तान संघाच्या मॅनेजरचे वृत्तपत्रात निवेदन आले होते की, मद्रास आणि कलकत्ता हे दोनही सामने आम्ही जिंकून वचपा घेवू' हे वाचताच मला राहवले नाही. याचवेळी मी नेहमीप्रमाणे संक्रांतीसाठी माझ्या स्नेह्यांना तिळगूळ पाठवित होतो. दि. १२ जानेवारी १९८० त्यात एक पत्र श्री. सुनील गावस्कर यासही पाठविले कारण त्यांनी पाकीस्तानबरोबर विशेष अशी कामगिरी केली नव्हती म्हणजे शतक झळकविले नव्हते ! वेस्ट इंडिज संघ दौऱ्यावर असताना अहमदनगर येथे एक महोत्सवी सामना होता. त्यावेळी श्री. गावस्कर शिर्डी येथे बाबांच्या दर्शनासाठी आले होते. मी त्यावेळी मंदिरात होतो. सहज गमतीने म्हणालो 'की श्रीबाबांचा आशिर्वाद घ्या' वेस्टइंडिजची मालिका जिंकालच ! योगायोग ! वेस्टइंडिज–आणि आस्ट्रेलिया बरोबरची मालिकाही भारताने जिंकलीच, आणि आता पाकीस्तानबरोबर एक सामना जिंकून आघाडी मिळविली होतीच' म्हणूनच त्यांना पत्र लिहिले सोबत उदी, बाबांचा फोटो आणि तिळगूळ, (हलवा) पाठविला पत्रात इतकाच मजकूर होता. खेळायला जाताना बाबांची उदी भाळी लावा आणि बाबांचे स्मरण करून खेळायला जा 'यशस्वी व्हालच'. त्याप्रमाणे मद्रासला चिदंबरम् स्टेडियमच्या पत्यावर हे पत्र रवाना केले. कारण त्यांचा पत्ता कुठे मला माहीत होता ! परंतु मला खात्री होती की हे पत्र वेळेवर मिळेलच ! मद्रासला त्यांच्या ९२ धावा पहिल्या दिवशी झाल्या ! लगेच मी मद्रासला टेलीग्राम पाठविला की, you played captain innings very well. Sai Ashirwad. दुसरे दिवशी "बाबांचा महत्वाचा दिवस गुरुवार" होता. निश्चित शतक झळकवणार (नाही तर ९९ वरही फलंदाज बाद झाले आहेत) गावसकरांचे शतक तर लागलेच. १६६ धावावर रेकार्ड प्रस्थापित करून गावसकर बाद झाले. व सामना जिंकून पाकिस्तानवर आघाडी, मिळविली. सामना संपताच वेळात वेळ काढून गावसकर यांनी मला २२-१-८० रोजी पत्र पाठविले की–बाबांचा फोटो आणि उदी योग्यवेळी मिळाली. उदीचा प्रभाव दिसून आला 'आभारी' ! श्रद्धेमुळेच हे घडून आले. असा आहे श्रीसाईबाबांच्या उदीचा प्रभाव !

★ ★ ★

# ॥ शिरडीचे श्रीसाईबाबा ॥

# शतक महोत्सवी प्रयोग रंगला

☆ ☆ ☆ ☆ ☆



☆ ☆ ☆ ☆ ☆

श्री. भाऊसाहेब पाठक श्री. कुमारसेन
गुप्ते यांचा सत्कार करतानाचे दृश्य

आरती थिएटर्स निर्मित शिरडीचे श्रीसाईबाबा या भक्तिरसप्रधान नाटकाचा शंभरावा प्रयोग रवि. ता. १३ एप्रिल ८० रोजी सकाळी १० वा. रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे थाटाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते तर मुख्य पाहुणे म्हणून माजी कोर्टरिसिव्हरसाहेब श्री. का. सी. पाठक हजर होते. त्यांच्याच शुभहस्ते नाटकातील कलावंतांचा सत्कार करून त्यांना स्मरण भेटी म्हणून रौप्य स्मृती चिन्हे देण्यात आली. नाटकाचे संगीत व निर्माते कुमारसेन गुप्ते असून लेखक, दिग्दर्शक व श्रीसाईबाबांची प्रमुख भूमिका श्री. किरण दुधाळकर यांची आहे. नाटकातील कलाकारांचे तर्फे श्री. व सौ. गुप्ते यांचा शाल व श्रीफळ अर्पण करून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात श्री. गुप्ते यांच्या चहात्यांनी पण भाग घेतला. समारंभप्रसंगी संस्थानचे इंजिनियर श्री. डी. सी. पाटील व श्री. काकरेसाहेब यांची कलाकारांचा गौरव करणारी भाषणे झाली.

# श्रीसाईलीला

## लेखक–कवी वर्गणीदारांना महत्वाच्या सूचना

१) श्रीसाईलीलेकडे पाठवावयाचे सारे लेख, कविता, चित्रे इ. साहित्य संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ याच पत्यावर पाठवावे. वर्गणीदारांनी पण आपली वार्षिक वर्गणी रुपये दहा याच पत्यावर पाठवावी; किंवा स्वतः येऊन भरावी व रितसर पोचपावती घ्यावी व ती नोंदीसाठी म्हणून जपून ठेवावी ही विनंती.

२) लेखक–कवींनी लिखाण पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूने भरपूर समास सोडून, सुवाच्च अक्षरात नवीन शुद्धलेखन पद्धतीचे नियमास अनुसरून लिहून पाठवावे. लिखाण कागदाच्या दोन्ही बाजूस लिहून किंवा इनलंड लेटरकिंवा पोस्टकार्डावर लिहून अजिबात पाठवू नये. ते स्वीकृत केले जाणार नाही.

३) श्रीसाईलीलेकडे लेखन पाठविताना श्रीसाईबाबा हाच प्रमुख विषय असावा. अन्य संतवाङ्मय, चरित्रे, भक्तीभाव, अध्यात्म, श्रीसाईभक्त, श्रीसाई मंदिरे इ. विषयांवरही साहित्य श्रीसाईलीलेकडे पाठविले तरी चालेल.

४) लेखाची पोच लेखकास त्वरीत हवी असल्यास लेखासोबत १५ पैशाचे तिकीट किंवा कार्ड सोबत जोडावे म्हणजे पोच रितसर पाठविली जाईल. पाठविलेल्या साहित्याचा निर्णय सुमारे महिन्याभरात कळविला जाईल. नापसंत साहित्य परत पाठविले जाईल.

५) कवींनी निदान दोन वर्षेतरी कविता अजिबात पाठवू नयेत.

६) पोस्टाने पाठवावयाचे सर्व अंक दरमहा एक तारखेस दादर मुख्य कचेरीतून योग्य त्या नोंदी घेऊन रवाना केले जातातच. उशिरात उशिरा म्हणजे सुमारे ८ तारखेपर्यंत ते देशभरच्या वर्गणीदाराना मिळावेत. अंक न मिळाल्याची तक्रार नजिकच्या डाकघरी करावी व मगच आम्हास लिहावे. अंक शिल्लक असल्यास पुन्हा पाठविला जाईल परंतु अशी शक्यता कमीच असते.

..............

# श्री. दाभोलकरांच्या श्रीसाई सच्चरितातील
# उदीबद्दलच्या काही निवडक ओव्या

प्रेषक—ले. कर्नल एम्. बी. निंबाळकर
१।१४ फाईव्हस्टार अपार्टमेंट बंडगार्डन, पुणे १

विभूतिदानीं मनोगत । बाबा काय सुचवीत ।
हें दृश्य सकळ विश्वांतर्गत । राख हे निश्चित मनीं उमजा ॥ अ. ३३ ओ. ११ ॥

देहही पंचभूतांचें काष्ठ । भोग भोगावया अवशिष्ठ ।
भोग सरतां पडेल निचेष्ठ । होईल विस्पष्ठ ही राख ॥ १२ ॥

तुमची माझी हीच स्थिती । तियेची तुम्हांस व्हावी स्मृति ।
अहर्निश मजही जागृती । तदर्थ विभूति देतसें ॥ १३ ॥

अखिल विश्व मायाविजृंभित । ब्रह्म सत्य, ब्रह्मांड अनृत ।
याची खूण ही उदी सत्य । निश्चितार्थ हा माना ॥ १४ ॥

येथे नाही कोणी कुणाचे । दारा, पुत्र, मामे, भाचे ।
नग्न आलों नग्न जायाचें । उदी ही यांचे स्मारक ॥ १५ ॥

उदीचें या केलिया चर्चन । आधि–व्याधि होती निरसन ।
परी या उदीचा तत्त्वार्थ गहन । विवेकपूर्ण वैराग्य ॥ १६ ॥

---

रक्षा, विभूती आणि उदी । शब्द तीन परीं एकार्थवादी ।
हाचि प्रसाद नित्य निरवधी । बाबा अबाधित वांटीत ॥ २३ ॥

---

काय बाबांच्या उदीचें महिमान । उदी शंकराचेही भूषण ।
भावें भाळी करी जो चर्चन । विघ्न निरसन तात्काळ ॥ २३३ ॥

करूनि मुखमार्जन स्नान । करी जो नित्य उदी विलेपन ।
चरणतीर्थ समवेत पान । पुण्यपावन होईल तो ॥ २३४ ॥

शिवाय या उदीचा विशेष । सेवितां होईल पूर्णायुष ।
होईल पातक निरसन अशेष । सुखसंतोष सर्वदा ॥ २३५ ॥

---

साईचरणीं ठेवूनि प्रीती । जे जे या साईची विभूती ।
नित्यनेमे सेविती लाविती । ते ते पावती मनेप्सित ॥ अ. ३५ ओ. २२२ ॥

धर्मादि चारी पुरुषार्थ । पावोनि होती ते कृतार्थ ।
प्रकट होतील सकल गुह्यार्थ । स्वार्थपरमार्थ समवेत ॥ २२३ ॥

महापापादी पापें प्रबळ । तैसींच उपपातकेंही सकळ ।
उदी संपर्के होती निर्मूळ । लाधे निर्मळता सबाह्य ॥ २२४ ॥

---

# श्रीसाईबाबांची किमया

—सौ. दिपा सतीशचंद्र ढापरे
मु. पोस्ट-मोठी दम्मण ( केंद्रशासित )
स्टेशन-तापी ( गुजरात )

● सुमारे १९ ते २० वर्षापासून माझे सासर-कुटुंब श्री भगवान साईबाबांचे निस्सीम भक्त असल्याने दररोज श्रीपूजा, आरती, स्तोत्रपठण वगैरे उपासना करून कपाळास उदी लावल्या शिवाय राहावयाचे नाही असा नित्याचा क्रम आहे. याबाबत अलिकडील सत्य घटनेची हकिगत घडली.

वरील नियमानुसार उदी संपुष्टात येऊ नये याची फारच काळजी घेऊन मधून मधून श्री शिर्डी क्षेत्रास काही अल्प रक्कम पाठवून उदी-प्रसाद मागवून घेतो. परंतु एकदा असे झाले की, उदी २।३ दिवसात संपुष्टात येत असल्याचे आम्हा कोणाचेही लक्षात आले नाही. जवळपास श्रीसाई भक्त खरे, परंतु उदी बाळगणारे कोणीही नाही तसेच बाहेर गावाहून मिळवून घेणे सुद्धा समय नसे. तेव्हा आता काय करावयाचे या चिंतेत माझ्या सासूबाई ( सौ. शालिनी सी. ढापरे ) राहून श्रीबाबांची आराधना—नामस्मरण करीत राहिल्या.

"जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ॥"

वरील श्री बाबांच्या वचनानुसार उदी ज्या दिवशी आमचे पूजेच्या साहित्यात संपुष्टात येणार त्याचे आदले दिवशी आमचे ध्यानी, मनी व आमचे नाव, गाव, पत्ता ओळखही नसताना अचानक पोस्टाने फक्त उदीची पुडी असलेले कव्हर आले. हे पाहून माझे सासूबाईसह सर्वांस आश्चर्य व आनंद वाटला. तदनंतर सर्वत्रांनी प्रथम श्रीबाबांच्या फोटोस प्रणाम केला. पोस्टाने आलेले उदीचे कव्हरावरील शिक्का पुसट असल्याने हे कव्हर कोठून आले याचा बोध होईना. बऱ्याच प्रयत्नाने व पोस्ट मास्तरांचे सहकार्याने हे कव्हर आम्हास बार्शी ( जिल्हा—सोलापूर ) हून आल्याचे दिसून आले. कोठे गुजरात आणि कोठे बार्शी एवढ्या दूरवरुन वेळीच उदी येणे, ही खरोखरच श्रीसाईबाबांची किमयाच होय अशी आमची पूर्ण श्रद्धा झाली.

म्हणून माझी सर्वत्रांस नम्र विनंती की, श्री बाबांच्यावर संपूर्ण श्रद्धा व सबूरी ठेवून जात, धर्म वगैरे काहीही न पहाता मनोभावे दररोज प्रार्थना केल्याशिवाय झोपी जाऊ नये.

एक अनाकलनीय अनुभव

# जगाचे महान डॉक्टर 'शिरडीचे श्रीसाईबाबा'

—श्री. रमेश डी. चव्हाण

साईनिकेतन, गुजरलेन, नवापूर

मु. पो. ता. नवापूर जि. धुळे, नवापूर

● मनुष्याच्या जीवनात अशा काही घटना अधून-मधून घडत असतात की, ज्या खरोखर अनाकलनीय असतात. ज्यावेळी मानवी प्रयत्न संपतात व आशेला जागाच राहीलेली नसते; अशावेळी बाबांची प्रार्थना केल्याने...उदीने...वा बाबांच्या. फोटोने गंडातर टळते हे निश्चित होय.

माझ्या मोठ्या वहिनी सौ. अन्नपूर्णाबाई दोधू चव्हाण यांच्या पोटात बऱ्याच वर्षांपासून गाठ होती. त्या गाठीचा वारंवार त्रास उद्‌भवत असे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ऑपरेशन करणे जरूरीचे होते म्हणूनच व्यारा जि० सुरत येथील 'जनक स्मारक हॉस्पीटल' मध्ये दि. ६ जून ७९ रोजी तब्येत दाखविण्यासाठी नेले असता तेथील चिफ मेडिकल ऑफिसर डॉ. एन. आर. देसाई यांनी दुसऱ्याच दिवशी ऑप्रेशन करण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे ७ जून ७९ रोजी गुरुवारी सौ. वहिनींचे ऑप्रेशन सुखरूप पार पडले.

ऑप्रेशन झाल्यानंतर प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आमची नातेवाईक व स्नेही मंडळी येऊ लागली. यातुनच बाबांच्या दैवी शक्तीचा अनुभव आम्हास यावयाचा होता. असेच आमचे मेहूणे श्री माधवराव श्रावण शिंपी हे पिंपळनेरहून आले..त्यांची प्रकृतीही थोडीसी बिघडल्याची लक्षणे चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होती. म्हणून माझे वडील बंधु श्री. दोधू धर्मा चव्हाण व श्री. मनोहर धर्मा चव्हाण यांनी त्यांना प्रकृती दाखविण्याचा आग्रह केला. त्या प्रमाणे त्यांनी प्रकृति दाखविली आणि आमच्यावर गंभीर होण्याची पाळी आली. शारिरीक तपासणी झाल्याबरोबर डॉ. देसाई म्हणाले, "माधवरावांना आजच ॲडमिट करावे लागेल. त्यांच्या शरीरात रक्ताचे प्रमाण चारच टक्के आहे. शिवाय इतरही अनेक आजार असल्याने ते काही दिवसाचेच सोबती ठरावेत...तूर्त रक्त देणे अगदी जरूरीचे व तात्काळ आहे." लगेचच माधवराव यांना ॲडमिट केले.

माधवराव यांच्या रक्ताचा ग्रुप Rh. A. Negative निघाला. ह्या ग्रुपचे रक्त सहसा मिळत नाही व मिळाले तरी अत्यंत किंमत मोजावी लागते. एका बाटलीस दिडशे रुपये. बारडोलीहून २ बाटल्या रक्त घेतले. दुसऱ्या दिवसापासून रक्त चढविण्यास सुरुवात केली.

दोन दिवसानंतर पुन्हा शारीरीक तपासणी केली असता रक्ताचे प्रमाण चार टक्क्यावरून सहा टक्के व्हावयाचे ऐवजी साडेतीन टक्क्यावर घसरले तशात वजन सुद्धा सहा किलोनी घटले. रक्त देऊनही तसेच औषधोपचार करुनही प्रकृतीत फरक न पडता उलट खालावल्याने डॉक्टर चिंतेत पडले. आमचेही मनोधैर्य पार ढासळले. आता कसे ? हा एकच प्रश्न मनाला सतावू लागला.

दुःख आले म्हणजे मनुष्य गांगरतो. तरीसुद्धा अशावेळी माणसाला धीर देणारा त्याच्या चित्ताचे समत्व राखणारा...सभोवार दुःख असुनही त्याला आत्मानंदात ठेवणारा असा समर्थ महापुरुष शिर्डीचे महान दैवत श्रीसद्गुरु साईबाबा होत. ज्यांचे वर माझी कैकवर्षापासून श्रद्धा आहे म्हणून मी कधीच फिकीर करीत नाही. फिकीर शब्दावरुन माझाच एक शेर आठवतो तो असा—

" दुःख संकटे आलीत जरी
करु नका कधीच फिकीर...
अंतरी ठेवा श्रद्धा सबुरी
आपोआप निवारील शिरडीचा फकीर ! "

अशा ह्या शिरडीच्या फकीराला नव्हे आजारग्रस्तांच्या डॉक्टरांना अनन्यभावाने प्रार्थना केली...

" खरंच तुझा साईबाबा
जर काही आधार नसता...
पुन्हा...पुन्हा असा तुझ्याकडे
धावा आम्ही केला नसता ! "

धावा केल्यानंतर बाबांची उदी मेहूण्यांना पाण्यातून दिली. तसेच कपाळाला लावली. उदीच्या अद्भूत प्रभावाच्या असंख्य कथा आहेत. आज बाबा देहाने आपल्यामध्ये नाहीत पण त्यांची उदी मात्र अनेकांना दिलासा देत आहे. पण या

उदीरूपी औषधाला मुख्य अनुपान आहे ते म्हणजे श्रद्धेचे. श्रद्धेशिवाय उदीची परीक्षा होऊच शकत नाही. श्रद्धेने उदीचा प्रयोग केला, व बाबांना म्हटले, "बाबा! आमचे मेहूणें या आजारातून जर बरे झाले तर आमच्या 'साईबाबा भक्त मंडळात' एका गुरुवारी प्रसाद चढवीन व अनुभव प्रसिद्ध करीन (प्रसाद म्हटल्या प्रमाणे चढविला व आता हा अनुभव) अशी प्रार्थना करीत असतानाच बाबांचे वचन आठवले—

"जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन, भक्तासाठी ॥
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित, अनुभवे ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा, वचन माझे ॥

बाबांच्या ह्या अमर संदेशाने मनुष्याला खूप धीर येतो व भक्तांच्या इच्छेप्रमाणे अनुभव येतात. काही लोक या अनुभवास इच्छापूर्ती म्हणतात...काही वरदान... तर काही चमत्कार म्हणतात. नाव काहीही द्या परंतु ज्यांच्या त्यांच्या श्रद्धेप्रमाणे ज्याला त्याला अनुभव येतात कारण:—

"जो जो मज भजे जैसा जैसा भावे । तैसा तैसा पावे, मी ही त्यांसी ॥

बाबांची शक्तीच एवढी प्रभावी आहे की, अशक्यप्राय गोष्टीसुद्धा शक्य होतात. त्याचवेळी डॉ. देसाई तपासवयास आले धीर देत म्हणाले, "कई फिकीर करता नही, बधु सारू थई जसे. फरी एकवार लोही आपी जोइशुं" (काही चिंता करू नका सर्व काही चांगलं होईल. पुन्हा एकदा रक्त देऊन पाहू.)

त्याप्रमाणे आणखी दोन बाटल्या रक्त बारडोलीहून आणून दिले. यावेळी मात्र एकदम चमत्कार झाला. मेहुण्यांच्या प्रकृतीत फरक पडला. चार-पाच दिवसानी पुन्हा तपासणी केली असता रक्ताचे प्रमाण आठ टक्के झाले. पंधरा-दिवसांनी दहा टक्के झाले. वजनसुद्धा पूर्ववत् झाले व लवकरच मेहुणे पूर्णपणे बरे झाले. बाबांमुळेच हे गंडातर टळले असे मी मानतो.

मृत्यु हा एक ना एक दिवस प्रत्येकाला गाठतोच परंतु त्यांना एक मुलगी. तीही लग्नाची. तसेच एक मुलगा तो T. Y. B. A ला आहे. एकुलता एकच मुलगा अजुन मिळवित नाही त्यामुळे त्यांचा जीव मागे अडकून पडला असता. परंतु जीवनात सर्व काही व्यवस्थित व्हावे म्हणून जगातला महान डॉक्टर श्रीसाई-बाबा धावून आले व एका महान संकटातून मुक्त केले; म्हणूनच मी या घटनेला

अनाकलनीय या सदरात टाकतो. जीवनात यशस्वी व्हावयाचे असल्यास श्रद्धा ही माणसाच्या ठिकाणी असायला हवी व त्यास सबुरीची जोड असल्यास त्या व्यक्तीच्या मागे श्रीसाईबाबांची पुण्याई सातत्याने उभी असते एवढे मात्र खरे आणि मी नकळत गुणगुणत असतो :—

'एक रोगी बहुत रोगी था । चरणोमें नाथ के गीरा ।
बोला मेरा करो भला । बाबा को आ गई दया ।
थोडीसी खाक दे दिया । प्रसाद भक्तने लिया ।
विश्वासका ये फल मिला । रोगी निरोगी हो गया ।
खबर लो हमारी, दया हो तुमारी, सुनो साईबाबा ।
॥ श्री साईबाबांना माझे शतशः प्रणाम ॥

**श्री पंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांच्या भक्त मंडळींना विनंती**

दि. २६ ऑक्टोबर १९८० रोजी श्रीपंत महाराजांच्या निर्वाणास पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. या अनुषंगाने श्रीपंत महाराज पुण्यतिथी अमृतोत्सव साजरा होणार आहे. या निमित्ताने श्रीपंत महाराजांचे चरित्र, वाङ्मय, कार्य, बोधपरंपरा, शिष्यभक्त परिवार, तत्त्वज्ञान, श्रीपंत मंदिरे, भजनी मंडळे इत्यादींच्या संदर्भात माहिती एकत्र करावयाची आहे व ती संपादित स्वरूपात प्रसिद्ध करावयाचा विचार आहे. तरी श्रीपंत महाराजांच्या सर्व भक्त मंडळींना प्रेमाची विनंती अशी की, या कार्यास उपयुक्त होईल अशी विविध प्रकारची माहिती खालील पत्यावर कृपया पाठवावी.

श्री. वि. द. कुलकर्णी
चिटणीस, श्रीदत्त संस्थान,
श्रीक्षेत्र बाळेकुंद्री, पीन कोड ५९११०३
जिल्हा बेळगाव, कर्नाटक

# उदी आणि आशिष

— सौ. मंगला सु. वैद्य
द्वारा / श्री. सुभाष अ. वैद्य
स्टेट बँक ऑफ इंडिया धार (म. प्र.)

● श्रीसाईबाबांच्या लीलेचा अनुभव लिहीण्याचा सर्वप्रथम मी विचार केला तेव्हा काय लिहावे हेच मला उमजेना कारण वसंत ऋतूत रंग-रंगांचे विविध सुगंधित पुष्पे उमलतात. रात्र होताच आकाशात मन मोहक चंद्र चांदणे हसू लागतात बघता-बघता सोनेरी दुपारचे मयुर पंखी संध्येत व संध्येचे काळ्या मखमली रात्रीत रुपांतर होते ह्या सर्व क्रियामध्ये .ज्या अगम्य शक्तीचा आभास होतो ती माझ्या बाबांची लीलाच नव्हे का ? बाबांच्या इच्छेवाचून काही होणे शक्य नाही, परंतु वर वर ज्या साठी आपण कारणीभूत असतो त्यासाठी 'हे मी केले' किंवा 'हे माझ्यामुळे झाले' असे आपण म्हणतो. परंतु जीवनात कधी-कधी असा प्रसंग येतो की त्या वेळी मनुष्याच्या हातात काहीच नसते तो सर्वच दृष्टीने पराभूत झालेला असतो अशावेळी काहीच कर्तृत्व मार्ग सापडला नाही म्हणजे तो व्याकुळ होऊन व काकुळतीला येवून आपल्या आराध्य देवतेला आळवतो व अशावेळी जर त्याचे इच्छित पूर्ण झाले व मनोरथ फळाला आले तर त्याची त्या आराध्यावर अधिकच भक्ति बसते व मग तो त्या घटनेस 'अनुभव' असे नाव देतो. अशाप्रकारे माझ्या जीवनात आलेला अनुभव येथे देत आहे.

श्रीसाईबाबांच्या आशिर्वादाने प्राप्त झालेल्या आमच्या पुत्राचे नाव आम्ही आशीष ठेवले आहे. आशीष खरोखरीच बाबांचा आशीष आहे. कारण अनेक वेळा बाबांनी आशीषला संकटातून बाल-बाल वाचविले आहे एकदा तर दुसऱ्या मजल्याच्या जीन्यातून थेट खाली पडूनही त्यास मुळीच लागले नाही व अलगद झाडावरून पडलेल्या फूलाप्रमाणे तो प्रसन्न दिसत होता. अशाच अनेक प्रसंगातून एक प्रसंग अगदी स्मरणीय आहे तो असा एकदा रात्री आशीषचे अंग कोमट लागू लागले व बघता बघता त्याचे अंग चांगलेच तापू लागले. लगेच त्यास डॉक्टरकडे नेले डॉक्टरने अनेक औषधे लिहून दिली परंतु सर्व ठिकाणी शोधून व सर्व मेडिकल स्टोअर्स पालथी घालूनही ती औषधे मिळाली नाहीत. डॉक्टरकडे जावून त्यांस सर्व स्थिती सांगितल्यावरून त्यांनी औषधे बदलून लिहून दिली. पुनः एकदा भ्रमंति केली परंतु त्यातीलही एक सुद्धा औषध मिळाले नाही. (त्या वेळी धार मध्ये औषधांची

फार शॉर्टेज होती ) निराश होऊन पुनः डॉक्टरांकडे गेलो तर तो दवाखाना बंद करून निघून गेला होता. रात्र बरीच झाल्या मुळे दुसरा कोणता डॉक्टर आणणेही अशक्य होते इकडे आशीषची तब्बेत तर आणखीनच बिघडत चालली होती. अशा वेळी बाबांची आठवण झाली आतुर होवून त्यांची मनोभावे प्रार्थना केली, बाबांची उदी आशीषच्या कपाळी लावून थोडी तोंडात घातली व किंकर्तव्य विमूढ होऊन त्याच्या उशाशी नामस्मरण करीत बसून राहिलो. झोपेचा विचारच करवत नव्हता. थोडा वेळ अशा स्थितीत गेल्या नंतर बघितले तर आशीषचा ताप हळु-हळू उतरू लागला, व थोड्याच वेळात नॉर्मल वर आला. त्याला उत्तम झोप लागली. सकाळी आशीष उठला तो प्रसन्न चित्त, हसत-खेळत. डॉक्टरचे एकही औषध न घेता केवळ बाबांच्या उदी मुळे व कृपा प्रसादा मुळे आशीष खडखडीत बरा झाला.

अशाच प्रकारे संकटाच्या महासागरातून श्रीबाबा पैल तिरावर नेवून सोडतात. बाबांचे स्मरण व उदी प्रयोग आमचा नित्य क्रम आहे. श्रीबाबांची कृपाच आमचा जीवनाधार आहे.

☆ ☆ ☆


# मुंबईत धर्मप्रशिक्षण शिबिर

पुणे कीर्तन महाविद्यालयाच्या पुरस्काराने दि. ५ ते १३ मे १९८० नऊ दिवस मुंबईत धर्मप्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. शिबिरात खिश्चन धर्म व तत्वज्ञानाचा खंडनमंडनात्मक अभ्यास होणार आहे. शिक्षण विनामूल्य असून भोजन व निवास खर्च दररोज दहा रुपये द्यावे लागेल. कीर्तनकार / प्रवचनकार, वक्ते, व धर्माभ्यासक यांनी या संधीचा लाभ घ्यावा. माहितीपत्रक मागवा.

—श्री गं. ना. कोपरकर,
१०/४, वेडेकर सदन,
मुगभाट मुंबई – ४

# बाबांच्या उदीचा महिमा

श्री. डी. के. जाधव मास्तर
२९, गुरु प्रसाद, कला नगर वांद्रा, मुंबई—५१.

● मी श्री साईबाबांचा भक्त आहे. मी ४६ वर्षे बाबांची सेवा करीत आहे. मला बाबांचे बरेच अनुभव आले आहेत. माझ्या घरी माझी सौभाग्यवती या बाबांच्या निस्सीम सेवा करीतात. माझा मुलगा जन्मल्या पासून त्याला (आकडी) येऊ लागली. मी त्या वेळी गोल देवळाजवळ रहात होतो. आमचे डॉ. पै. यांचे औषध चालू होते पण राहुन राहून त्याला आकडी येतच होती,

माझी सौभाग्यवती दुसऱ्या वेळी हॉस्पीटल मध्ये गेली त्याच वेळी माझ्या मुलाची प्रकृती जास्त झाली. त्याला आकडीचे झटके येवू लागले त्या वेळी मी डॉ, पै ना बोलाविले व त्याने मला बाहेर बोलावून सांगितले हा मुलगा राहणार नाही. तुम्ही त्याला हॉस्पीटल मध्ये घेऊन जाणे, मी बरे म्हटले.

मी विचार करीत बसलो त्याच वेळी माझ्या घरी लाईफ साईजचा बाबांचा फोटो मी तयार केला आहे. त्या फोटो खाली मी माझ्या बाळाला ठेवला व बाबांना कळकळीने हाक मारली व सांगीतले बाबा हा तुमचा बाळ आहे याला तुम्हीच बरे करु शकता व त्याच वेळी मी माझ्या बाबांची उदी मी चमच्यात कालवून त्या बाळाच्या तोंडात घातली. त्या वेळी बाबांना सांगितले हे माझे बाळ चांगले झाले तर मी तुमच्या समाधी मंदीरात आणीन. मी त्याचे नाम विधी शिर्डीमध्ये आपल्या चरणा जवळ करीन.

मी फक्त बाबांना बोलो आणि माझे मागणे बाबांनी ऐकले. माझे बाळ बरे झाल्यावर मी व सौ. त्यास शिरडीस घेऊन गेलो व माझ्या बाळाचे नाव साईनाथ ठेवले.

हा बाबांच्या उदीचा महिमा.

☆

# आजही श्रीबाबांचे मार्गदर्शन—

—लीलाताई गोखले

शनिवार पेठ, पुणे—३०

● श्रीसाईबाबांविषयी मला अनेक अनुभव आले आहेत. त्यावरून श्रीबाबा अजूनही भक्तांना मार्गदर्शन करतात अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

मला एखादा प्रश्न सतावीत असेल तर साईकथेवर आधारित एखादे पुस्तक मी हाती घेते. डोळे मिटून त्यातील कोणतेही पान उघडते. त्या पानावर जो मजकूर असेल तो वाचते. आतापर्यंत खूपवेळा माझ्या प्रश्नाचे उत्तर त्या पानामध्ये मला सापडले आहे.

सोमवार दि. ११–६–७९ रोजी मनास सताविणारी अशी एक घटना घडली. माझ्या मामेभावाने माझ्या पत्रिकेवरून आठवा शनी मला येणार असे सांगितले! यावर ग्रहशांतिचा उपाय म्हणून त्याने 'श्रीराम जयराम जयजयराम' या मंत्राचा जप अकरा वेळा करून अकरा वेळा भीमरूपी स्तोत्र, एकशे एकवीस दिवस मारूतीपुढे कापूर लावून वाचावयास सांगितले.

श्रीबाबांनाच मी सर्वस्व मानले असल्यामुळे हे कामनिक व्रत आपण करावे की नाही असा विचार एकसारखा माझ्या मनात त्रस्त करीत होता. तोच मंगळवार दि. १२–६–७९ रोजी सकाळी उठल्याबरोबर डॉ. के. भ. गव्हाणकर यांचे 'शिर्डीचे साईबाबा' हे पुस्तक मी हाती घेतले आणि डोळे मिटून त्यातील एक पान काढले. ते पान सॉलिसिटर काकासाहेब दीक्षित यांच्या गुरुभक्ती संबंधीचे होते.

त्या पानावर माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले नाही. यामुळे संबंध दिवस-भर मी बेचैन होते. दैनंदिन व्यवहार नित्याप्रमाणे चालू होते; पण मन मात्र ते व्रत मी करू की नको या एकाच विचाराने व्यग्र होते. अखेर बुधवार दि. १३–६–७९ रोजी मला माझ्या प्रश्नाचे उत्तर त्याच पुस्तकात सापडले. ते पृष्ठ ३१२ आहे.

त्या दिवशी गणेशचतुर्थी होती. सकाळी उठून मी पुस्तकाचे पान काढले. डॉ. गव्हाणकर यांनी श्री. अण्णासाहेब कामत यांना लिहिलेले ते पत्र होते. वर, आग्र-भागी 'श्रीसाई–गणेश' असे लिहिलेले होते.

परमपूज्य श्रीसाईबाबांनी डॉ. गव्हाणकर यांना दर्शन दिले. त्यावेळी डॉ. गव्हाणकर यांनी त्याना " आपण कोण आहा ? " असा प्रश्न केला. त्यावर श्रीबाबांनी, माझे नाव काय बरेऽऽ ! वनचर ! वायुपुत्र ! गगननेत्र । ब्रह्ममात्र ! खातो पंचपात्र " असे तीन वेळा म्हटले. " हातातील काढ " असेही श्रीबाबांनी म्हटले. यावेळी डॉ. गव्हाणकर यांच्या हातात श्रीशनिदेवाची आणि श्रीबाबांची आंगठी होती.

' वायुपुत्र ' हा शब्द वाचताच मला " अंजनीगर्भ संकूतो वायुपुत्र महाबलिः " या मी रोज अकरा वेळा म्हणत असलेल्या श्लोकाची आठवण झाली. त्याच्याचपुढे ३१३ पानावर " मनी धरावा सद्गुरू. भावना दृढ करावी. मनी भावना दृढ करावी. एक मार्ग धरावा. हजारो नको " असा उपदेश आहे.

हे वाचीत असताना श्रीबाबा मलाच उपदेश करीत आहेत असे वाटून तावडतोब मी उदी लावली. त्याच क्षणी मनातील द्वंद्व संपून मनास एकदम बरे वाटले.

असो. त्याच पानावर पुढे " बारा वाजले. मंगळवार लागला. " असे लिहिले आहे. मी मंगळवारी शोध घेत होते. त्याचा बोध मला बुधवारी मिळाला. पण प्रत्यक्षात श्रीबाबा मंगळवारच म्हणत आहेत, असा मला भास झाला.

गणपती आणि मंगळवार यांचे साहचर्य आहेच. चतुर्थी म्हणून मी त्या पुस्तकातील ' वरदस्तोत्र ' वाचले. त्यातील सहावी ओवी " श्रीहनुमंता तुज नमो " अशी आहे.

गणेशचतुर्थीच्या–विघ्नहर्त्याच्या दिवशीच, माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सुरुवातीसच मला माझ्या प्रश्नाचे उत्तर सापडले. ते उत्तर असे की " श्रीबाबा म्हणजे सर्वच आहेत. "

माझ्या प्रश्नाचे उत्तर मला समाधानकारक रीतीने मिळाले या गोष्टीचा अर्थातच मला खूप आनंद झाला. एका परीने श्रीबाबांचा माझ्यावर हा अनुग्रहच झाला.

☆ ☆ ☆

# बाबा धावून आले

—:—

—श्री. मधुकर सी. मंडलीक
टेलिफोन ऑपरेटर सराफगल्ली
नवापूर जि. धुळे नवापूर ४२५४१८

" शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी । "

श्रीसाईबाबांच्या वरील वचनांचा अनुभव मला ज्वलंत स्वरूपात आला आणि त्या दिवसापासून बाबांवरची श्रद्धा दृढ झाली त्याची हकीकत अशी—

जुलै १९७८ मध्ये मला दम्याचा त्रास जाणवू लागला. त्रास वाढू नये व वेळींच उपचार व्हावा म्हणून डॉक्टरांकडे गेलो डॉक्टरांनी शारीरीक तपासणी करून सांगितले की, तुमचा आजार लवकर बरा होऊ शकेल मात्र काही इंजेक्शनचा कोर्स करावा लागेल. आजार लवकर बरा होऊ नये असे कुणास वाटेल ? मी लागलीच सांगितले, " डॉक्टर, आज पासूनच इंजेक्शन सुरू करा; " आणि डॉक्टरांनी इंजेक्शन दिले.

" कर्माकर्म विकर्म निरसे ।
श्रद्धा बैसे गुरूपायी ॥ "

साईबाबांवरील श्रद्धा दृढ व्हावी व भक्ती वाढावी असेच बाबांच्या मनात असावे आणि म्हणूनच की काय—डॉक्टरांनी दिलेले इंजेक्शन सेप्टीक झाले आणि कंबरेवर टणक गाठ झाली. त्या गाठीतून पातळ लस सारखी वाहू लागली. याकरिता दोन-तीन महिने वेगवेगळया डॉक्टरांकडून औषधोपचार केले परंतु लस वाहणे थांबायचे नाही. माझा धीर सुटत चालला.

अशावेळी डॉक्टर मित्रांनी ऑपरेशनचा सल्ला दिला. ऑपरेशनचे नाव ऐकताच माझ्या छातीत धस्स् झाले. सारे शरीराचा थरकाप उडाला. ऑप्रेशन करावे की नाही या विचाराने डोके नुसते सुन्न झाले. ऑपरेशन करणे आवश्यक होते. या प्रसंगातून सुखरुपपणे सुटका व्हावी म्हणून बाबांचा धावा केला.
" बाबा तूच रक्षण कर ! "

"सोप्यातला सोपा उपाय
हृदयी स्मरावे साईचे पाय
हाचि एक तरणोपाय..."

बाबांशिवाय तरणोपाय नाही. बाबांना हृदयापासून स्मरून नंदुरबारला ऑपरेशन करावयास जावयाचे असे ठरवून डॉक्टरांचे रिपोर्ट घेतले...आठ दिवसांची रजा टाकली. जाण्याच्या दोन दिवस अगोदर बाबांची उदी दिवसातून दोन-तीन वेळा लावत गेलो व अनन्य भावाने प्रार्थना केली की ऑपरेशन सुलभ होऊ दे!

बाबांच्या उदीचा चमत्कार अनेकांनी यापूर्वी घेतले आहेत. आजच्या या विज्ञानयुगातसुद्धा बाबांच्या उदीने आजार बरे होतात. मलासुद्धा इतक्या अकल्पितपणे चमत्कार अनुभवास मिळेल असे वाटत नव्हते. पण बाबा आपल्या शरण आलेल्या भक्तांस खाली हाताने पाठवित नसतात.

"शरण मज अला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी!"

ज्या भावनेने उदी लावली त्या प्रमाणात प्रभाव दिसून आला. नंदुरबारच्या डॉक्टरांनी तपासणी केली तर त्यांनी ऑपरेशन करण्याची आवश्यकता नाही. कारण एकाएकी लस वाहणे बिलकूल बंद झाले होते.

ऑपरेशन करण्याची आवश्यकता नाही हे डॉक्टरांचे शब्द ऐकून मी आनंदून गेलो. डोळयात आनंदाश्रू उभे राहिले. बाबांची किमया अगाध आहे. बाबांनी स्वहस्ते पेटविलेल्या धुनीतून संजीवनी समान उदी आपल्या भक्तांना पवित्र ठेवा होय. केवळ उदीमुळेच माझी गाठ बरी झाली याची मला खात्री आहे.

बाबांच्या उदीचे अनुभव मला व माझ्या कुटुंबातील लहानथोरांना नेहमीच येत असतात. बाबांनी आपल्या शरीराचा त्याग केला असला तरी स्वहस्ते पेटविलेल्या धुनीतील उदी आज भक्तांना किती मोठा दिलासा देत आहे, व उदीच्या माध्यमातून बाबाच धावून येतात. बाबांचे वचनच मुळी आहे की,

"जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी!"

श्रीसाईबाबांना माझे शतशः प्रणाम!

* * *

# श्री साईची लीला

—सौ. रजनी त्रिं. लिमये
४२५।४९ टिळक म. विद्यापीठ नगर पुणे ९

● माझी २/३ वर्षांपासून तब्बेत बरी नव्हती. कित्येक वेळा जीव घाबरा होऊन माझे बरे-वाईट तर होणार नाही ना असे वाटत असे. एके दिवशी अशीच मी घाबरी झाले. आता माझे काय होणार आहे समजेना. तेव्हा मी श्रीसाईबाबांना सांगितले बाबा माझी मुले लहान आहेत. ती मोठी होईपर्यंत मला जगावयासच पाहिजे. माझी तब्बेत बरी झाल्यावर मी तुमच्या पाया पडावयास येईन. पाण्यात उदी मिसळून ते पाणी मी प्याले. त्यानंतर ३/४ तासात मला प्रकृतीत आराम पडावयास लागला. माझ्या अंगात ताकद नव्हती तरीही मी हे व माझी मुले आम्ही सर्वजण चार दिवसांनी शिरडीला गेलो. प्रवास चांगला झाला. गुरुवार असूनही दर्शन चांगले झाले. बाबांची लीला अगाध आहे. माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले.

श्रीसाईमाऊलीच्या कृपेने आता माझी तब्बेत चांगली आहे शिरडीला लेंडी बागेत कडूलिंबाच्या झाडाखाली आम्हाला एक रुपयाचे नाणे मिळाले आहे. आम्ही तो रुपया पूजेत ठेवला आहे.

---

## श्रीसाईकृपा संगीत विद्यालय

आमचे येथे शास्त्रोक्त गायन व सरकारमान्य गांधर्व महाविद्यालयाचे प्रमाणपत्र दिले जाते. तसेच नाट्यसंगीत, भावगीत, भजन, फिल्म संगीत, व तबलासोलो हार्मोनियम, व्हायोलिन, स्पॅनिश, हवाईन, व इलेक्ट्रीक गिटार, बोंगो, सितार, बांसुरी, क्लोरोनेट, ढोलक, ढोलकी, आणि भरतनाट्यम् हे विषय प्रसिद्ध कलाकाराच्या द्वारे शिकवले जातात.

घरी येऊन सुद्धा शिकविण्याची खास व्यवस्था आहे.

आजच भेटा—
श्री. विपुल अ. कुलेंकर
साईसदन, आरे रोड,
पेरुबाग, गोरेगाव ( पूर्व )
मुंबई ४०० ०६३

# उदी आणि माझा कान

—श्री. दत्तात्रय हरिश्चन्द्र दळवी
मु. पो. आळे ता.–जुन्नर जि. पुणे.

● मी जवळ जवळ ३५ वर्षे कानाच्या विकाराने अधून मधून आजारी असे. त्या साठी पुण्यातील प्रसिद्ध अशा दोन तज्ञ कान, नाक, व घशाचे ( डॉक्टर ) यांचे कडून कानाच्या शस्त्रक्रिया तीनदा करून घेतल्या तेवढ्या पुरता त्रास थांबे परंतु पुन्हा त्रास होत असे. मी पूर्णपणे वैतागून गेलो होतो. परंतु उपाय सापडत नव्हता. मी सर्व कुटुंबासह मे १९७८ मध्ये शिर्डीला गेलो. येताना उदीचा प्रसाद म्हणून आणला होता. सदरची उदी मी साईबाबांचे नाव घेऊन दोन वेळा दुखणाऱ्या कानामध्ये टाकली आणि काय आश्चर्य ! थोड्याच दिवसात माझा कानाचा त्रास पूर्णपणे थांबला आज पर्यंत पुन्हा त्रास झाला नाही. तेव्हा पासून माझी बाबांचेवर व त्यांचे उदीवर श्रद्धा बसली आहे. मी रोज साईचरित्र तेव्हा पासून वाचत असतो, व मनाने नामाचा जप जसा वेळ मिळेल तसा करित असतो. तेव्हा पासून माझी शारिरीक मानसिक आर्थिक व आध्यात्मिक प्रगती होत आहे. जर श्रद्धा ठेवून कोणतेही काम केले तर यश हमखास येते, असे बाबा भक्तांसाठी धाव घेतात.

---

# बाबांच्या उदीचा महिमा

—मंजुळा खं. पाठारे
बी. आय. प्रथमेश सोसायटी प्रभादेवी,
वीर सावरकर मार्ग दादर २५

● १९७८ सालातली गोष्ट चालताना माझ्या डाव्या पायाचा घोटा दुखायचा व चालताना काहीतरी कापल्यासारखे व्हावयाचे. बरेच घरगुती उपचार लेप वगैरे घालून झाले पण पाय बरा होण्याचे चिन्ह दिसेना. म्हणून डॉक्टरकडे (हाडस्पेशालीस्ट) कडे गेले. त्याने एक्सरे काढून पाहिला व हाड वाढल्याचे सांगून इंजेक्शनचा कोर्स घेण्यास सांगितले त्याप्रमाणे कोर्स पूर्ण केला. हाड रुपायचे थांबले. पण पायाची सूज मात्र कमी झाली नाही. काय करावे सुचेनासे झाले. अगदी कंटाळून गेले होते. इतक्यात मार्च १९७९ चे साईलीला मासिक माझ्या हाती आले. मी उघडून पाहिले. त्या महिन्याच्या अंकात उदीचा महिमा होता. सर्वांनी दिलेले अनुभव वाचले; व मनाशी ठरवले बाबा मी तुमच्या भेटीला येत नाही म्हणून माझा पाय सुजतो का ? आजपासून मी डॉक्टरकडे न जाता तुमची उदी लाविन. तुम्हीच माझे डॉक्टर आहात. माझा पाय बरा झाला तर साईलीला मासिकात मी माझा अनुभव कळविन आणि तेव्हापासून माझा पाय बरा झाला असे आमचे बाबा. जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव.

☆

# शिरडीचे साईबाबा नवसाला पावले

—श्री. तुळशीदास रामचंद्र चोपडेकर
प्रकाशचाळ नं. ४८२, जवाहरनगर,
खार पूर्व मुंबई—५५

● सप्टेंबर १९७३ मध्ये माझी पत्नी सौ. सुलोचना हिला पाचव्या महिन्यात एक्सरे घेऊन डॉ. चौबळ (साफल्य मॅटर्निटी) यांनी असे निदान केले की सौ. सुलोचना हिच्या पोटात ट्युमर (गोळा) आहे आणि मुल सुद्धा आहे. ट्युमरचे ऑपरेशन करावे लागेल डॉ. चौबळ हे शस्त्रक्रियेत प्रविण आहेत. भिण्याचे तसे कारण नव्हते. परंतु लग्नानंतर सात वर्षांनी प्रथमच मुल होण्याची आशा उत्पन्न झाली होती त्यात ऑपरेशन सांगितल्यामुळे मी भितीने ऑपरेशन करण्यास नकार दिला. तेव्हा डॉक्टरने सौ. सुलोचना हिस आपल्या मॅटर्निटी होम मध्ये ॲडमिट करून उपचार चालू केले, ट्युमर कमी होण्यासाठी इंजिक्शने चालू केली. पंधरा दिवस हॉस्पिटलमध्ये राहिल्यानंतर तिला घरी आणण्यासाठी डॉक्टरांची परवानगी घेण्यास गेलो तेव्हा डॉक्टर म्हणाले, तिला (पेशन्टला) अजून एक महिना ठेवावे लागेल. परंतु मी आग्रह केल्यामुळे डॉक्टरने आणण्यास परवानगी दिली. परंतु गंभीर सूचना देवून ठेवली की पेशन्टला जास्त हालचाल किंवा जड काम करायला द्यायचे नाही शक्यतो कॉटवरुन उतरायचे नाही. आणि हे तुम्हाला शक्य होत नसेल तर एकमहिना तिला हॉस्पिटलमध्येच ठेवा. माझ्या आर्थिक परिस्थितीच्या मानाने एक महिना स्पेशल कॉटचे भाडे भरून ठेवणे अशक्य होते. माझा श्री साईबाबांवर पूर्ण विश्वास होता त्यामुळे मी डॉक्टरना विनंती करून सौ. ला घरी (खोलीवर) आणले. औषध इंजिक्शने चालूच होती. परंतु त्याचबरोबर श्रीसाईबाबांची उदी सतत चालू होती. उदीतर सुरवातीपासून चालू होतीच परंतु आता तर नियमित जवळच असायची उदी संपली की शेजारी रहात असलेल्या साईभक्त मळेकर यांचेकडून मागून आणावी हा नित्यक्रम चालू होता.

घरचे काम केल्याशिवाय चालण्यासारखे नव्हते कारण घरी दुसरे माणूस नव्हते बाबांवर विश्वास ठेवून घरची सर्व कामे सौ. करीत असे.

सातव्या महिन्यात डॉक्टरनी तपासून ऑपरेशन करणे अवश्य असल्याचे सांगितले कारण ट्युमरमुळे मुलाच्या वाढीला अडथळा होत होता. परंतु याहीवेळी मी ऑपरेशनला नकार दिला, व सौ. ला सांगितले की तू मुळीच चिंता करू नको बाबांच्या कृपेने सर्व ठीक होईल.

त्यानंतर दोन महिने काहीच त्रास झाला नाही. नववा महिना पूर्ण झाला आणि ८ फेब्रुवारी १९७३ रोजी डॉक्टर चौबळ यांनी पेशन्टची तपासणी करून मला आपल्या रुममध्ये बोलावून घेतले आणि सर्व परिस्थिती समजावून सांगितली. पोटातील ट्यूमरमुळे मुलाची गर्भाशयातील रचना बरोबर नसल्याने मुल आडवे येणार असल्या-मुळे ऑपरेशन करावेच लागेल. यावेळी ऑपरेशनला नकार देणे योग्य नसल्याने मी ऑपरेशन करण्याचे कबूल केले आणि त्याप्रमाणे दिवस ठरविला. डॉक्टर म्हणाले आजपासून आठ दिवसानी घेऊन या सर्व नक्की करून डॉक्टरांचा निरोप घेऊन आम्ही घरी ( खोलीवर ) येण्यास निघालो.

घरी येते वेळी सौ. सुलोचना थोड्या रागाने आणि रडत मला म्हणते 'तुम्ही नेहमी म्हणता की बाबांच्या कृपेने सर्व ठीक होईल परंतु ऑपरेशन करायचे टळले नाहीच ना ! ऑपरेशन करावे लागू नये म्हणून इंजिक्शनचा खर्च करून बसलात आता पुढे कसे होणार ! बाबांना काळजी असती तर ही वेळ आली नसती. त्यावर मी सौ.ला म्हणालो, " हे बघ तू असे काही बोलू नको मला साईबाबांचा पुष्कळ अनुभव आलेला आहे परंतु तू जर असे म्हणत असशील तर साईबाबा यावेळी तुला अनुभव देतील माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा ! परंतु तिची समजूत पटली नाही.

सौ. ने दाखविलेला अविश्वास व डॉक्टरनी सांगितलेले ऑपरेशन यामुळे माझा सुद्धा धीर सुटला आणि डोळ्यात अश्रू आणून अतिशय कळवळयाने माझे दैवत " श्रीसाईबाबा " यांना असा नवस केला की 'जर ऑपरेशन शिवाय माझ्या पत्नीची चांगल्याप्रकारे सुटका झाली तर तिला घेऊन मी शिरडीला आपल्या समा-धीच्या दर्शनास येईन.

नवस बोलून सुमारे पाच मिनिटे झाली नसतील आम्ही वाटेतच होतो. दुपारचे १२॥ वाजले होते. सौ. मला म्हणाली लवकर खोलीवर चला मला बरे वाटत नाही. आम्ही जलद गतीने घरी (खोलीवर) यायला निघालो. खोलीवर येऊन पोचलो जेवण बनविण्यास सुरवात केली परंतु सौ. ला जास्त त्रास होऊ लागला म्हणून शेजारच्या दोन बायकांना सोबत घेऊन तिला टॅक्सीत बसवून सुमारे १० मिनिटात साफल्य मॅटर्निटी होम गाठले. दुपारचे २ वाजले होते. सौ.ला प्रसुति गृहात पोचऊन मी चिंताग्रस्त होऊन बाबांचे नाव घेत बाहेर बसलो होतो. प्रसुति-गृहात पोचल्यावर सुमारे पाच मिनिटे झाली असतील आणि डॉक्टर मी बसलो होतो त्या ठिकाणी येताना मला दिसले सोबत आमची शेजारची बाई होती त्यामुळे मी

अतिशय घाबरून गेलो. भितभीत अधिरतेने डॉक्टरना विचारले सौ. बरी आहे ना ? मला वाटले की आता ऑपरेशनचे सांगतील परंतु डॉक्टर हसत हसत मला म्हणाले तुम्हाला मुलगा झाला आहे आणि दोघेही ( बाळ व आई ) चांगली आहेत. ऑपरेशन करण्यासारखी स्थिती होती परंतु सर्व काही व्यवस्थित झाले. तुमच्यावर देवाची कृपा आहे. ते ऐकून मला अतिशय आनंद झाला व बाबांच्या अगाध अतर्क्य लीलेची प्रचिती आली. नंतर प्रसुतिगृहात जाऊन पहातो तर सौ. हसत आहे आणि बाळ सोऽहं करीत रडत आहे.

हा अनुभव देऊन माझ्या पत्निला श्री साईबाबांनी दाखऊन दिले की श्रद्धा, सबुरी व दृढविश्वास ठेवला तर प्रत्येकाला असा अनुभव येईल.

कोणताही त्रास न होता मला बाबांच्या नवसाने पुत्र लाभ झाला त्याची आठवण म्हणून त्याचे नाव " साईनाथ " असे ठेवले शिवाय जन्म दिवस 'गुरुवार' होता. नंतर आम्ही सर्व शिरडी येथे जाऊन बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन आलो.

या घटनेचे ( प्रचितीचे ) विशेष म्हणजे स्पेशालीस्ट डॉक्टरांनी तपासून आठ दिवसांनी बोलाविले असून सुद्धा नवस बोललो. त्याच दिवशी म्हणजे गुरुवार ८ फेब्रुवारी ७२ लाच आणि नवस बोलून झाल्यानंतर सुमारे दोन तासाच्या आत ऑपरेशन शिवाय कोणताही त्रास न होता माझ्या सौ. ला पुत्रलाभ झाला. यावरून बाबांनी दिलेल्या या वचनाची प्रचिती येते.

---

# भक्तांची ओढ-बाबा जाणतात

**श्री दशरथ रामजी तळेकर**
मुकेश मिल कंपाऊंड, ना. आ, सावंत रोड,
कुलाबा, मुंबई-५.

● श्रद्धा ही मानवाच्या जीवनातील हिरवळ आहे. असे म्हणतात आणी ते खरेही आहे. माणसाची कुठेतरी श्रद्धा असल्याशिवाय त्याच्या जीवनाला अर्थच येणार नाही. श्रद्धे विना जीवन म्हणजे एक रखरखीत वाळवंटच म्हटले पाहिजे. श्रद्धा म्हणजे विश्वास. माणसाचा कुठेतरी विश्वास असायलाच पाहीजे. अर्थात प्रत्येकाचे श्रद्धास्थान वेगळे असते. आपण परमेश्वराची पूजा करतो म्हणजे नेमके काय करतो? आपल्या मनाचा त्या ठायी विश्वास बसला असतो, आणि असा विश्वास परमेश्वरा-ठायी बसला की त्या श्रद्धादायी माणसाला निरनिराळे अनुभव (साक्षात्कार, दृष्टांत) यायला लागतात. माझे श्रद्धा स्थान शिरडीचे साईबाबा. वेडीवाकडी जमेल तशी भक्ती

करतो. अर्थात साईबाबा माझी भक्ती पावन करुन घेतात. माझीच काय? पण जो जो बाबांची जशी जशी भक्ती करतो तशी तशी बाबा त्या त्या भक्ताला हरघडीला कोणत्या ना कोणत्या रुपाने येऊन दर्शन देतातच! कधी कधी कोणाच्या तरी रूपात येऊन घाबरलेल्यांना जीवनोपयोगी सल्ला देतात. संकटात सापडलेल्यांना धीर देतात, तर कधी कधी स्वप्नात येऊन प्रत्यक्ष दर्शन देऊन जातात. साईबाबांची नित्य नेमाने पूजा करणाऱ्या व केवळ हरघडीला स्मरण करणाऱ्या व्यक्तीला असे बरेचसे अनुभव येतातच. मला तर बाबांनी किती वेळा अनेक रूपांनी येऊन दर्शन दिले आहे. अनेक वेळा संकटात धीर दिला आहे. बाबा हे सारे भक्तासाठी करतातच पण बाबांची उदी सुद्धा आज जनमानसात व साऱ्या समाजात लोकात प्रसिद्ध झाली आहे. असाध्य रोग सुद्धा बाबांच्या केवळ उदीमुळे बरे झाले आहेत. बाबांच्या उदीमुळे अनेकांच्या जीवनाला नवे चैतन्य मिळाले आहे. हताश व हतबल झालेल्या ह्या लोकांना 'कल्याणाचा मार्ग' सापडला आहे.

बाबांच्या या उदीचे हजारोना हजार, लाखभर अनुभव आले आहेत. आज मात्र मी या रोगमुक्त, भयमुक्त, व्याधी मुक्त करणाऱ्या उदी बद्दल वेगळाच अनुभव कथन करणार आहे. मी शिरडीला तीन वर्षा पूर्वी गेलो होतो. तेव्हा बरीचशी उदी आणली होती. रोज सकाळी पूजा केल्यावर व बाहेर जाताना कपाळाला उदी लावायची असा माझा नित्यनेम. जून ७९ मध्ये माझ्याजवळ असलेली उदी संपत आली. शिरडील जाणे मला जमत नव्हते. आता बाबांची 'उदी' कशी मिळणार, कुठे मिळणार ! या विवंचनेत मी नेहमी होतो. पण ही माझी अडचण व जरूरी साईबाबांनी जाणली व मला शिरडीहून घरपोच उदी पाठवून दिली. त्याचे असे झाले—

१२ जून ७८ च्या मंगळवारी सकाळी मी 'भक्तिसंगम'चे संपादक श्री. सुधाकर सामंत यांच्याकडे कामासाठी गेलो होतो. त्यांच्या दाराला कुलूप पहाताच मी शेजारी चौकशी केली. तेव्हा मला समजले की, 'सामंत शिरडीला गेले आहेत, दोन तीन दिवसात परत येतील.' शेजाऱ्यांकडून निरोप समजल्यावर मी निघालो, मनात विचार केला, 'सामंत शिरडीला गेले आहेत तेव्हा परत येताना ते उदी व प्रसाद जरूर आणतीलच तेव्हा आपण दोन चार दिवसानी परत येवू या ! व उदी व प्रसाद घेऊन जाऊ या ! यानंतर पुन्हा मी सामंत यांच्याकडे बुधवार ता. २० जून रोजी सकाळी ८ वाजता घरी गेलो. सामंत "श्रीसाई कुसुमावली" वाचीत होते. व सौ. सामंत समोर बसून ऐकत होत्या. मी आत गेलो. खुर्चीवर बसलो. सामंतांनी पुस्तक वाचून खाली ठेवले व मला नेहमीप्रमाणे म्हणाले, "बोला, तळेकर,' मी म्हणालो, "मागच्या आठवड्यात मी येऊन गेलो तेव्हा आपण शिरडीला गेल्याचे समजले.

म्हणून आज मुद्दाम बाबांचा प्रसाद व उदी नेण्यासाठी आलो आहे माझ्याजवळ असलेली उदी संपत आली आहे. तेव्हा मला उदी व प्रसाद द्या. " मी एका दमात सारे बोललो.

सामंतांनी हे ऐकताच सौ. सामंतना मला उदी व प्रसाद देण्यास सांगितले. सौ. सामंतनी मला उदी व प्रसाद दिला. मी प्रसाद आनंदाने खाल्ला; व उदीची पुडी घेऊन व सामंतांचा निरोप घेऊन मी घरी आलो. बरेच दिवस मनात घोळत होते की आपल्याला उदी कशी मिळेल ? पण बाबांनी माझी अडचण ओळखून मला सामंतामार्फत उदी पोचती केली.

त्याच दिवशी घरी येऊन मी जेवून झोपलो. झोपून उठल्यावर चहा घेत असतानाच पोस्टमनने 'तळेकर' म्हणून हाक मारली. पोस्टमनच्या हातातील पाकीट घेऊन मी चहा प्यायच्या आधीच ते फोडले. आत एक छोटीशी चिठ्ठी होती व चिठ्ठीच्या आत एक पुडी होती. चिठ्ठीत लिहिले होते—

" गेल्या आठवड्यात मी पुण्याला गेलो होतो. तेथून शिरडीला जाण्याचा योग आला. शिरडीला साईच्या सान्निध्यात दोन दिवस राहून कालच ठाण्याला परत आलो. आल्या आल्याच तुला बाबांची उदी पोस्टाने पाठवून देत आहे.— तुझे भाई आणि वहिनी !!!

ठाण्याच्या श्री चंद्रकांत देशमुख यांच्याकडून ही उदी आली होती. एक श्रद्धाळू व प्रेमळ कुटुंब आहे. हे माझा आणि त्यांचा परिचयसुद्धा एका धार्मिक कार्यातूनच झाला. तेव्हापासून आजपर्यंत आम्ही माणुसकीच्या धाग्याने जखडलो आहोत. !

किती योगायोग पहा ! माझ्या मनातील " उदीची ओढ " बाबांनी कशी बरे जाणली ? आणि आश्चर्य पहा ! बाबांनी मला लवकरात लवकर एकाच दिवशी उदी मिळण्याची व्यवस्था केली. म्हणजे बाबा भक्तांचे मनोरथ त्यांच्या इच्छा, आकांक्षा कोणत्या मार्गाने व कशा कशा पुऱ्या करतात याचे हे अजबच उदाहरण आहे. प्रत्येक भक्तांच्या मनातील इच्छा जाणून घेऊन बाबा शिरडीला बसून कशी नवलाई घडवून आणतात ते पहा ! याच उदीने आजपर्यंत लाखो लोकांची संकटे टळली आहेत. टळत आहेत व यापुढेही हे असेच टाळत रहातील यात तिळमात्र शंका नाही.

अनेक व्याधी, उपाधी टाळणारी, संकटे दूर करणारी 'बाबांची उदी' बाबांनी मला अशाप्रकारे पाठवून दिली याचे मला कमालीचे आश्चर्य वाटते. मी प्रत्येकाजवळ बाबांची ही 'नवलाई' सांगत असतो. बाबा, तुमच्या लीलांना पार नाही !!

● ● ●

# मी आणि बाबांची उदी

—स. स. देशपांडे
रामदास कॉलनी ११ जळगाव

नित्य मी जिवंत जाणा हेंची सत्य ॥
नित्य घ्या प्रचिती अनुभवें ॥

● दिनांक २ आक्टोबर ७८ रोजी सायंकाळी बाहेर गावाहून घरी आलो, आलो· तेच एक मोठे चमत्कारीक दुखणे घेऊनच. त्या दिवशी दुपारी साधारण २ वाजेपासून माझ्या उजवे हाताचे आंगठ्याजवळचे व मधले बोटांचे पेचात अचानक आग होऊ लागली व ती आग इतकी भयानक की मी अक्षरशः रडू लागलो. तसाच सायंकाळी घरी आलो दोन बोटात ठराविक ठिकाणीच अगदी, भयंकर आग. हा काय प्रकार आहे. काही म्हणता काही समजत नव्हते. चंदन उगाळून लावले पण काही उपयोग नाही. शेवटी सकाळी डॉ. कडे जावे अशा विचारात तगमग सोसून तसाच पडून राहिलो.

त्या दिवशी अचानक दोन पाहुणे (पती व पत्नी) आमचे कडे रात्री ८ वा. आले. त्यांचा परिचयही पहिलाच. पण ते पहिल्या परिचयातच इतके जवळचे वाटू लागले. ते अत्यंत गोड व लाघवी स्वभावाचे होते. त्यांनी रात्री १२ पर्यंत गप्पा मारल्या व त्यावेळी त्यांना माझ्या बोटातील आगीचा प्रकार समजला. ते म्हणाले, तुम्ही सकाळी आमचे बरोबर आमचे गावी चला. हा आजार फार भयानक असतो. याला "एनओ" असे म्हणतात. हा प्रकार वाढला तर सगळा हात आग करु लागेल व मग जीवन नको असा वैताग येईल यावर डॉ. उपाय काहीच कामाचे नाहीत. आलेल्या पाहुण्यांची भावजय या आजारावर मंत्र घालते व दुखणारा हात जमिनीवर टेकला म्हणजे आपोआप पुढे पुढे सरकतो, व तो मंत्र तावडतोब तुम्ही घालाच त्यासाठी सकाळी आमचे बरोबरच आमचे गावी चला. सकाळी ३ आक्टोबर सकाळीच जगदंबेची स्थापना करावयाची होती व कोणत्याही परिस्थितीत मला तर बाहेर जाता येणार नव्हते. असा पेच पडला तेवढ्यात आमची नं. २ ची कन्या श्रीसाईबाबांची एकनिष्ठ भक्त तिनेच रस्ता सांगितला. तो असा-आताच मी बाबांना विनंती केली, आहे व ही उदी शिर्डीचे प्रसादात आलेली माझ्याजवळ आहे ही हातास दुखाण्याचे जागी चोळा व थोडी तोंडात टाका वर पाणी घ्या व मग आपण पाहू पुढे काय ठरवायचे मला खात्री आहे माझे बाबा हे दुखणे तावडतोब संपवतील. असे म्हणून तिने उदी माझे बोटाचे पेचात चोळली थोडी कपाळाला लावली थोडी

तोंडात टाकून वर पाणी पिण्यास दिले. हा वेळ होता होता रात्रीचे १२॥–१ वाजला होता. आग भयंकर चालू होती. झोप कशी लागायची ह्या विवंचनेत मी होतो पण जशी डॉ. कडून झोपेची गोळी आणून ती घ्यावी अगदी त्याप्रमाणे जादू व्हावी तसे झाले, व हे घरातील सर्व लोक गप्पा मारीत आहे तेवढ्यात २/३ मिनीटात मला गाढ झोप लागली व सकाळी बरोबर ४–३० वा. मी. जागा झालो, व आश्चर्य म्हणजे बोटाचे पेचात आग बिलकुल बंद झालेली. भरपूर उत्साहाने मी प्रातर्विधी आटोपून जगदंबेची स्थापना करणेचे उद्योगास लागलो मात्र जगदंबेपुढे बसलो असता प्रथम मला बाबांचे वरील उद्गार आठवले व मी बाबांपुढे सा. प्रणीपात घातला. मनुष्य जीवन हे खूप खाचा खळग्यांनी भरलेले आहे पण त्याबरोबरच ईश्वरावरील संपूर्ण श्रद्धा हा उपायही प्रभुने मानवास देऊन ठेवला आहे. योग्यवेळी सर्व सत्ताधीश प्रभु साई आपल्या भक्तास धैर्य देऊन संकटातून सुटणेसाठी कशा व कोणत्या प्रकारे मार्ग दाखविल हे अनुभवा शिवाय कळणारच नाही. दिनांक १३ ऑगस्ट ७९ रोज सोमवार. श्रावणातला ३ रा सोमवार. सकाळचीवेळ ९ वा. शिवाचे अभिषेकासाठी गुरुजी आलेले, आधीच श्रावण महिना हा सणावारांनी पूर्ण भरलेला व आनंद मय उत्साही. बाहेर पाऊस चालूच आहे अशा या मंगल व पूर्व सुगंधीत क्षणि संकट कसे कोठून आले व ते माझ्या बाबांनी कसे निवारले याची हकिकत-श्रद्धा व सबुरी ही दोन साईचरणी ज्याने अर्पण केली त्याला कधी काळाचेही भय नाही. माझी नं. २ ची मुलगी कु. शालीनी वय २२ साईबाबांची निस्सीम भक्त तर वरील दिवशी व वेळी ही आमची शालू ताई आंघोळ आटोपून घरात आली व एका एकी तिचे काही दुखत खुपत नसताना तिचे मानेचे स्नायु दोषीत झाले व ती मान वर वर ओढू लागली डोळे पारावर चढले व आचके देऊ लागली. अंगाला थंडगार घाम. चांगली बी. ए. झालेली सुंदर कन्या एकाएकी अशी अत्यअवस्थ झालेली पाहिली तर माता पिता व घरातील लहान बहिण भाऊ यांची काय तिरपीट उडाली असेल हे अनुभवा शिवाय शब्दात कितीही सांगीतले तरी अपुरेच. मी सरळ माझ्या साईबाबांचे तसबीरी पुढे हात जोडले विनंती केली बाबा प्रत्येक क्षणी तुम्ही माझे व पोरांचे पाठीशी आहांत व या एकाच श्रद्धेवर व सबूरीचे शिकवणीवर मी आहे. मला या अचानक आलेल्या संकटाला तोंड देण्याचे धैर्य द्या. यश देणारे तुम्हीच आहात ते मी तुमचेवरच सोडीत आहे. मला फक्त मनाचे धैर्य व मार्ग सुचवा अशी प्रार्थना केली डब्यातून उदी घेतली. तशाही घाई गर्दीत मुलीला उदी दिली त्या लुळ्या मानेवर उदी चोळली व रिक्षात घालून बाबांचे नाव घेऊन नेहमीचे डॉ. पाटील यांचे कडे गेलो. सुदैवाने डॉ. मोकळे सापडले व लगेच त्यांनी तिला टेबलावर घेऊन तपासले व लगेच एक इंजेक्शन दिले. शेजारचे दुकानातून मला गोळ्या आणण्यास सांगितल्या., तेवढ्या १० मिनीटात दुसरे इंजेक्शन दिले व मला घाबरु नका २ तासात ही व्यवस्थित होईल असे ठामपणे सांगितले व

खरोखर दोन तासांनी तिच्या वेदना अजिबात थांबल्या व तिला झोप लागली. मी व घरातील सर्व कुटुंबीय तिच्या कॉटजवळ बसूनच होतो. सारखा बाबांचा धावा चालू होता उदी लावणे व तोंडात देणे चालू होते व अशा प्रकारे फार मोठे संकट बाबांनी अगदी २ तासात संपूर्ण टाळले नंतर दुसरे दिवशी डॉ. सांगू लागले तो अटॅक फार भयंकर होता पण काही तरी पुण्य आडवे आले. "बुद्धी जैसी देशील साई तसाच वागेन मी या ओळी आठवल्या. संकट काळी मनाचे धैर्य देऊन मला योग्य मार्गाने ठेउन माझ्या लाडक्या लेकीला जिवदान दिले त्या माझ्या बाबांना माझे शतशः प्रणाम.

☆


# श्रीसाई गीत गुंजन

उत्सवासाठी

## प्रसिद्ध कलाकांराच्या संचात

## ३ तास भरगच्च कार्यक्रम ठेवा

श्रीमती ह. भ. प. जानकीबाई इंगळे यांचे श्रवणीय किर्तन तसेच सौ. आशा दयानंद इंगळे यांनी लिहीलेली श्रीसाईबाबांची अभंगवाणी, सादरकर्ते व गायक कलाकार श्री. विपुल अ. कुलेंकर तसेच शास्त्रीय गायन, नाट्यगीत, भावगीत, फिल्मसंगीत व हार्मोनियम आणि तबलासोलो, नकला, विविध गमती-जमतीचे कार्यक्रम व बहूरुपीच्या वेषात प्रत्यक्ष साईबाबा पाहा.

आजच भेटा,

श्री. विपुल अनंतराव कुलेंकर

श्रीसाई कृपा संगीत विद्यालय,
साई सदन, आरे रोड, पेरुबाग,
गोरेगाव (पूर्व), मुं.–४०० ०६३.

# भक्तप्रिय साई

—सौ. सुनिता त्रिंबक चावक
'रामचंद्रभुवन,' फुले मार्ग, साईमंदिरा-
जवळ, विष्णू नगर, डोंबिवली (पश्चिम)

● आम्ही दर वर्षांतून एकदा शिर्डी येथे जात असतो. त्यावेळी मी जे जे वांछिते ते ते मला लाभते. असा माझा...तीन वर्षे सतत अनुभव आहे. अनेक संकट प्रसंगी श्रीसाईनाथ धावून येतात, आणि संकटे निर्वाण करतात. माझे दुःखापासून संरक्षण करतात.

मध्यंतरी माझ्या मिस्टरांना मोठे आजारपण आले होते. सारख्या ओकाऱ्या व जुलाब होत होत्या. मी अतिशय घाबरून गेली होती. तीन दिवस फॅमिली डॉक्टरांचे औषध घेऊनही गुण मुळीच येत नव्हता; अतिशय अशक्तपणा आला होता, डॉक्टरांनी नीट तपासणी करून औषधे व इंजेक्शने घेतली. तरी आजारपणात सुधारणा होत नव्हती. उलट अतिशय त्रास होवू लागला. ह्यापुढील गोष्ट म्हणजे दवाखान्यात ठेवणेच क्रमप्राप्त होते. घरी लहान मुलगा व मोठे माणूस असे घरात कोणीच नसल्याने फारच तारांबळ उडत होती. त्यातून ते दिवस संतत पावसाच्या धारेचे होते. अशा वेळेस मला फक्त एकच आसरा होता. आणि तो म्हणजे श्री साईनाथांचा—

अशा वेळेस मला कसे सुचले कोणास ठाऊक. कदाचित् साईनाथांनीच बुद्धी दिली असणार मी साईची उदी हातात घेवून त्यांच्या कपाळी लावली व साईना हाक मारून सांगितले की, हे साईसमर्था तूच काय तो मला आधार होय, आणि काय आश्चर्य! पुढील दिवसापासून ह्यांचे दुखणे नॉर्मलवर आले व दोन दिवसांनी हे चांगले झाले. जय साईसमर्था.

असाच आणखी एक प्रसंग आपणास सांगते. तो म्हणजे रेल्वे अपघाताचा होय.

अतिशय फास्ट लोकल डोंबिवलीला सकाळी ९ वाजून १ मिनिटांनी सुटते. आणि त्याच गाडीतून हे नेहमी जातात. त्याच गाडीला दिवा स्टेशनला अपघात झाला. माझे मिस्टर ज्या डब्यात बसत तोच डबा रुळावरून संपूर्ण घसरला. मला आमच्या घरी गाडीचा अपघात झाल्याची बातमी समजली, व मी वेडीपिसी झाले. काय करावे काही सूचेना. नीट माहिती नसल्याने नाना शंकाकुशंका मनात येवू

लागल्या. आणि त्याचवेळी मी श्रीचे नामस्मरण सुरू केले. उदी लावली करुणा भाकली की, ' ह्यांना सुखी ठेव. '

आणि अतिशय आनंदाची गोष्ट म्हणजे श्री साईकृपेने ह्यांना काहीच झाले नव्हते. इतकेच नव्हे तर कुठल्याही प्रकारची मनुष्यहानी तेथे झाली नव्हती. हे ऐकून माझे अंतःकरण भरून आले व परत साईनाथांना नमस्कार केला व अशीच कृपा नेहमी आम्हावर ठेव हीच प्रार्थना ! त्या अखंड साईसमर्थास माझे कोटी कोटी प्रणाम.

☆ ☆ ☆

# साईकृपेने पाय बरा झाला—

श्री. विजयकुमार डी. चव्हाण
१, नवभारत हौसिंग सोसायटी, मु. पो.
ता. नवापूर जि. धुळे, पिन ४२ ५४ १८

● जगद्गुरु श्री समर्थ साईबाबांच्या कृपेने या जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. भक्तांनी फक्त अनन्यभावे शरण यावे व दृढ भाव ठेवल्यास चमत्कार अनुभवावयास मिळतो.

दोन–तीन महिन्यापूर्वी माझ्या पायावर गेले कित्येक दिवसापासून जखम होती. सुरुवातीस थोडी खाज सुटायची नंतर त्यातून लस वाहायला लागायची चालतानाही त्रास व्हायचा. परंतु ही गोष्ट मी घरात कुणालाच कळविली नाही. परंतु जेव्हा त्रास वाढला तेव्हा सांगणे भागच पडले. शेवटी डॉक्टरचे औषध–उपचार चालू केले. बरेच दिवस इलाज करुनही सर्व व्यर्थ. खरा रोग काय होता ते डॉक्टरांना कळू शकत नव्हता, आणि पायहि बरा होत नव्हता.

आणि एके दिवशी बाबा स्वप्नात आले नी सूचना केली, " बेटा ! उदी पायावर मळ आणि थोडी खा म्हणजे तू लवकर बरा होशील ! "

दुसऱ्या दिवशी मी बाबांना अनन्यभावाने शरण जाऊन प्रार्थना केली, बाबा माझ्यावरही कृपा करा. माझा पाय बरा करा. आणि पायावर उदी रूपी मलम लावू लागलो. आणि काय आश्चर्य अवघ्या तीन–चार दिवसातच पाय पूर्णपणे बरा झाला.

श्रद्धा ही एक बलाढ्य शक्ती आहे. जिच्या द्वारे अशक्य गोष्ट शक्य झाली. बाबांची प्रत्येक भक्ताने श्रद्धेने व निष्ठेने पूजा केली तर बाबा त्या भक्ताला कुठल्याही संकटातून वाचविल्याशिवाय राहणार नाहीत. आतापर्यंत कुठलाही भक्त बाबांच्या चरणाशी आला तर बाबांनी त्याला सहारा दिलाच. स्वतः बाबांनी म्हटले आहे की—

' शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी ! "

बाबांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच घडत असते. त्यानंतर पायाला काहीसुद्धा झाले नाही.

श्रीसाईबाबा म्हणजे दयेची देवता, कारुण्याची मूर्ती माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या जीवनाला देखील ते सहजस्पर्श करून जातात तेव्हा मन भारावते, कृतज्ञतेने ओथंबते व नाम स्मरणात डुंबते. अशावेळी नकळत मुखातून ओवी बाहेर पडतात.

" देई मला दर्शन । साई देई मला दर्शन
भावभक्तीने, तुझ्या भेटीला आलो मी शरण ॥ धृ० ॥
भक्त जनांची तूच माऊली
तुझ्या कृपेने मिळे साऊली
संकटाच्या वाटेवर ती तूच आश्रयस्थान ॥ १ ॥

# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी येथील श्री रामनवमी उत्सव १९८०

सालाबादप्रमाणे ह्या वर्षी श्रीसाईबाबा संस्थान शिरडीने दि. २३-३-८० ते २५-३-८० असा ३ दिवस श्री रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहाने आणि भाविकतेने साजरा केला. ह्या वर्षी हा उत्सव थोडा लवकरच आल्यामुळे उन्हाळा भासला नाही आणि पाण्याचीहि कमतरता मुळीच भासली नाही. विषेश म्हणजे लोकांना उन्हापासून बचाव व्हावा, त्यांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून संस्थानाने जवळ जवळ सर्व परिसर मंडपाच्छादीत केला. ठिक ठिकाणी भव्य कमानीचे प्रवेशद्वार बांधून परिसर सुशोभित केला. जेवणाकरिता भक्तांची अलोट गर्दी असतानाही त्यांना रांगा लावताना उन्हात उभे रहावे लागले नाही. तसेच मंदिराच्या दक्षिणेसहि संपूर्ण गल्ली मंडपाच्छादीत केली असल्यामुळे बाबांच्या दर्शनाकरिता रांगेत उभे रहाणाऱ्या लोकांना त्रास झाला नाही. लोकांना उत्सवाचे तीनहि दिवस पिण्याच्या पाण्याच्या

माठामध्ये तसेच संस्थानच्या विहिरींमध्ये मुबलक प्रमाणात बर्फ टाकून थंड पाणी पुरविण्यात आले. भाविकांना नेहमीच्या (पात्रास) रु. १-५० या दरामध्ये उत्सवाचे तीन्ही दिवशी प्रसाद रुपाने मिष्टान्न भोजन देण्यात आले. उत्सवाच्या पहिले दिवशी शिरा, दुसरे दिवशी जिलबी व तिसऱ्या दिवशी बुंदीचे लाडू यांचा जेवणात समावेश होता. हजारो लोकांनी भोजनात भाग घेतला. प्रसाद रुपाने अन्नदान करण्यात आले. जास्तीत जास्त भक्तगणांना निवासाची सोय संस्थानच्या मालकीच्या अनेक इमारतील खोल्यातून करण्यात आली. त्याशिवाय माध्यमिक व प्राथमिक शाळा यांच्या इमारतीचीही त्या त्या शाळांच्या चालकांच्या सहकार्याने भक्तांच्या निवासा करिता उपयोग करण्यात आला. तरीही ही सोय वाढत्या गर्दीच्या मानाने अपुरी पडली आणि त्यामुळे हजारोंच्या संख्येत लोकाना संस्थान परिसरातील कांक्रीटने बांधलेल्या रस्त्यावर झोपावे लागले. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे असे झोपणे खोल्यातून झोपण्यापेक्षा लोकांना जास्त आवडले. ह्या वर्षी मंदिरावर आणि कळसावर आणि मंदिराच्या आंत विजेची रोषणाई विस्तृत प्रमाणात करण्यात आली होती. त्यामुळे उत्सवाची शोभ द्विगुणीत झाली.

उत्सवाच्या तीनही दिवसात नित्या प्रमाणे धार्मिक विधी चालू होते. मुख्य रामनवमीचे दिवशी हजारोंच्या संख्येत लोकांनी गोदावरी नदीच्या पवित्र जलाच्या भरलेल्या कावडी आणल्या आणि त्या कावडीचे स्वागत संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे यांनी केले. शिर्डीत सबंध गावातून त्या कावडी मिरवणूकीने फिरुन समाधी मंदिराच्या दक्षिणेकडील दरवाजातून समाधी मंदिरात आल्या व त्या कावडीमधील पवित्र जलाने श्रीसाईबाबांची मूर्ती व समाधी यांना स्नान घालण्यात आले. हा अपूर्व सोहळा जवळपास २ तासा पर्यंत चालला. संस्थान तर्फे त्या कावडीवाल्यांना श्रीसाईबाबांचा प्रसाद म्हणून नारळ देण्यात आले.

ह्या सर्व सोहळयाचा गाभा म्हणजे श्री संत दासगणू परंपरेतील ह. भ. प. श्री. अनंतराव आठवले महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन. तीनही दिवस समाधी मंदिरासमोरील पटांगणात झाले. ते पटांगण आणि समाधी मंदिराच्या आतील भाग माणसांनी खचाखच भरला होता. कीर्तना करिता आख्यान पहिले दिवशी...मेवाडची थोर संतीण मीराबाई आणि दुसरे दिवशी श्रीराम जन्म होते. तिसरे दिवशी काल्याचे कीर्तन झाले. दहिहंडी फोडून काला पूर्ण झाला. महाराजांची कीर्तन शैली सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत होती.

उत्सानिमित्त समाधी मंदिरापुढील प्रांगणात सांस्कृतीक कार्यक्रम तीनही दिवस झाले. पहिले दिवशी ता. २३-३-८० रोजी प्रसिद्ध गायक रेडिओस्टारा डॉ. वसंतराव देशपांडे यांचे गायन आयोजित करण्यात आले होते पण काही अपरि-

हार्य कारणामुळे ते येऊ न शकल्यामुळे कोपरगाव येथील आनंद संगीत विद्यालयाच्या गायक गायिकांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कलाकारांनी भजने आणि गीते गाऊन श्रोत्यांचे रंजन केले. गायकांमध्ये त्या विद्यालयाचे प्राचार्य श्री. आण्णा आढाव आणि रेडिओ गायक श्री. बाबुराव नरोडे यांचाही समावेश होता. बहारदार कार्यक्रम झाला. दुसरे दिवशी म्हणजे श्रीरामनवमीचे मुख्य दिवशी रात्री उपस्थित कलाकारांना श्रीबाबांपुढे हजेरी लावण्याची संधी देण्यात आली. त्यात प्रामुख्याने श्री. राजकुमार केतकर, नटराज नृत्य निकेतन, ठाणे यांचे कथ्थक नृत्य, श्रीमती शशिकला वैशंपायन आणि कु. लीला शेलार ठाणे यांच्या गायनाच्या कार्यक्रमाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. तिसरे दिवशी श्री. अजित कडकडे रेडिओ टी. व्ही. स्टार आणि स्टेज आर्टिस्ट मुंबई यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. श्रोत्यांना संगीताची मेजवानी मिळाली. त्यांना पेटीची साथ श्री. चंद्रचुड वासुदेव आणि तबल्याची साथ श्रीसाईनाथ ब्यांकर यांनी दिली.

उत्सवाचे प्रथम दिवशी श्रींच्या पालखीमध्ये श्रीबाबांच्या फोटोची मिरवणूक गावातून काढण्यात आली. रामनवमीचे दिवशी दुपारी ४ वाजता निशाणाची मिरवणूक आणि त्यानंतर श्रीबाबांच्या रथाची मिरवणूक काढण्यात आली. रथ विद्युत् रोषणाईने पूर्णपणे सुशोभित करण्यात आला होता. मिरवणूक सबंध गावातून फिरून समाधी मंदिरा जवळ येऊन विसर्जीत झाली. मिरवणूकीत हजारो भक्तांनी भाग घेतला, आणि ठिकठिकाणी थांबून फटाके, शोभेची दारू उडवून आनंद व्यक्त केला. तसेच श्री. एकनाथ कोते, तुकारामबुवा परदेशी, रविन्द्र जोशी व इतरांनी भारूडे म्हटली. श्रीसाईबाबांनी आपल्या हयातीतच रामनवमीच्या दिवशी मुसलमानांना संदलची मिरवणूक काढण्याची प्रथा पाडून सर्व जमातीमध्ये ऐक्याची भावना निर्माण केली. ती प्रथा आज पर्यंत चालू आहे. ह्या वर्षी देखील संदलची मिरवणूक रामनवमीचे रात्री समाधी मंदिरात आली आणि संदलातील लोकांनी समाधी भोवती बसून प्रार्थना केली.

ह्या वर्षीही साईबाबांना अर्पण केलेल्या कपडे, चांदीच्या वस्तू व इतर वस्तू यांची प्रसाद म्हणून जाहिर लिलावाने विक्री करण्यात आली आणि त्याचा लाभ अनेक भक्तांनी घेतला.

कोर्ट-रिसिव्हर श्री. क. हि. काकरे यांनी उत्सवातील सर्व कार्यक्रमास हजर राहून भाग घेतला. तसेच गावकऱ्यांतर्फे यात्रेमध्ये आयोजित केलेल्या कुस्तीच्या दंगलीस हजर राहून पहिलवानांना एकूण रु. दोन हजारची बक्षिसे वाटली. कुस्त्या करिता श्री. दादू चौगुले, हिरामण बनकर, श्री. पाचपुते व लांबलांबचे नामांकित कुस्तीगीर उपस्थित होते.

यात्रेमध्ये एक लाखाहून जास्त भाविकांनी उपस्थित राहून श्रीबाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

# शिरडी-वृत्त माहे मार्च सन १९८०

## — रामनवमी-उत्सव —

श्रीसाईनाथ महाराज यांचा श्रीरामनवमी उत्सव रविवार दि. २३-३-८० रोजी सुरु होऊन मंगळवार दि. २५-३-८० रोजी समाप्त झाला. गर्दी बरीच होती.

**उत्सवाचा पहिला दिवस:**—रविवार दि. २३-३-८० रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती सुरु झाली. चैत्र शु॥ अष्टमीला पहाटे ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थान मार्गे श्रीचे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी चांदीच्या भव्य सिंहासनात फोटो ठेवून साईसच्चरित्र वाचनास सुरूवात झाली. दुपारी ४-३० ते ६-३० पर्यंत ह. भ. प. श्री. अनंतराव आठवले महाराज यांचे किर्तन झाले. रात्री ७-३० ते ९ व ९-३० ते ११ पर्यंत श्री आनंद संगीत विद्यालय कोपरगाव व श्री. बाबूराव नरोडे रेडिओ स्टार यांच्या भजन गायनाचा कार्यक्रम झाला. रात्री ९-१५ ते ११-१५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक भजन, गायन, बाजंत्री, चौघडा, लेझीम, बॅण्डपथकाचे वादनासह मिरवणूक वाजत-गाजत गावतून फिरून आल्यावर भोजन गृहासमोर स्थानिक लोकांचे भारूड गारूड कार्यक्रम झाले. मिरवणूक थाटात मंदिरात आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :**—सोमवार दि. २४-४-८० रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यापासूनच श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांच्या रांगा लागल्या होत्या. पहाटे ५-१५ वा. काकड आरती झाल्यावर ६ वा. श्रींच्या साईसच्चरित ग्रंथाची २४ तास वाचन चालू असलेली समाप्ती मिरवणूक गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. सकाळी ६-३० वा. कावडी मिरणूकीस प्रारंभ झाला. कावडीवाल्यानी गोदावरी गंगेच्या आणलेल्या पाण्याची पूजा मा. रिसिव्हर श्री. काकरे साहेब यांनी केली व श्रीफळ अर्पण केल्यावर मिरवणूक गावातून फिरून आली. प्रत्येक कावडी धारकाने श्रींच्या समाधिस गंगेच्या पाण्याने स्नान घातले व दर्शन घेऊन जातेवेळी श्रीफळ प्रसाद घेतला.

सकाळी ११ ते १२-३० पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे श्री राम जन्मावरील कीर्तन झाले. दुपारी ४-१५ ते सायंकाळी ७-३० पर्यंत श्रींच्या निशाणाची व रथाची मिरवणूक गावातून आल्यावर धुपारती झाली.

रात्रौ ९ ते १० पर्यंत श्री. राजकुमार केतकर मुंबई यांचे कथ्थक नृत्य झाले. १० ते दुसरे दिवशी सकाळी ६ वाजे पर्यंत उपस्थीत कलाकारांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. श्रींचे मंदिर साई भक्तांचे दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

रामनवमी उत्सवाची पूर्व तयारी म्हणून एक महिना अगोदर मा. श्री. क. हि. काकरे साहेब रिसीव्हर यांनी संस्थानचे सर्व खाते प्रमुखांची सभा घेऊन कामाची रुपरेषा आखून दिली होती, व **संस्थान कर्मचाऱ्यांच्या साह्याने उत्सव** व्यवस्थीत पार पाडला.

**गुढी पाडवा :—** गुढी पाडव्यानिमित्त श्रीसाईबाबांना महा अभिषेक करून मंदिराचे कळसा जवळ ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर रात्री ८–३० ते १० वाजे पर्यंत संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कीर्तन झाले. त्यानंतर शेजारती झाली.काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे.

**उत्सवाचा ३ रा दिवस :—** मंगळवार दि. २५–३–८० रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. भक्तांचे अभिषेक झाल्यावर सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे काला कीर्तन, दही हंडी कार्यक्रम पाहाण्यास फारच गर्दी झाली होती. शांत चित्ताने लोक कीर्तन ऐकत होते. श्रीयुत अनंतराव महाराज व श्री. तुकारामबुवा यांच्या फुगड्या पिंगा चालू असता साईनामाचे गजरात दही हंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला. दुपारी १२–३० ला माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७–३० ते १०–३० पर्यंत श्री. अजित कडकडे रेडिओस्टार मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर शेजारती झाली व तीर्थप्रसाद वाटल्यावर उत्सव समाप्त झाला.

**कीर्तन :–** १) संस्थात गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.
२) ह. भ. प. तुकारामबुवा आजेगावकर यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन :–** प. पू. स्वामी पुरुषोत्तमानंदजी पुणे यांचे प्रवचन झाले.

**नृत्य :–** श्री. राजकुमार केतकर यांचे कथ्यक नृत्य झाले.

**भजन, गायन, वादन, वगैरे :** १) श्री. इंद्रप्रसाद मेहता, हरियाना. २) श्री. विनायक वि. निरगुडकर, अमरावती.
३) श्री. के. व्ही. गोपालकृष्ण, विजागापट्टम्.
४) सौ. के. व्ही. सावित्री विजगापट्टम्.

५) सौ. नागरत्नम मद्रास. ६) श्री. इंद्रायणी भजनी मंडळ, ठाणे. ७) श्री. दत्तात्रय रा. आंबर्डेकर वेंगुर्ला. ८) ह. भ. प. श्री. लक्ष्मण जा. मोकळ, कुलाबा

भजनी मंडळ. ९ ) श्री. सी. जे. कमल. भगवान सत्यसाई सेवा मंडळ मुंबई. १०) स्वामी रामनंद कुर्नूल. ११ ) सौ. राजन, दिल्ली. १२ ) श्री. भास्कर संगीत विद्यालय टिळकनगर मुंबई. १३ ) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर मुंबई. १४ ) श्री. एम. के. किर्तीकर मुंबई. १५ ) श्री. नरेंद्र भा. वरोडकर मुंबई. १६ ) कु. लीलाताई शेलार ठाणे. १७ ) सौ. वैशाली केतकर ठाणे. १८ ) पंडीत नृजराज मिश्र ठाणे. १९) सौ. शशिकला वैशंपायन नासिक. २० ) श्री. मधुकर वैशंपायन मुंबई. २१ ) कु. सुवर्णा वैशंपायन नासीक. २२ ) श्री. भोलानाथ समेळ मुंबई. २३ ) श्री. शिवराम बिडवे संगमनेर. २४ ) श्री. माधवराव तुपे पुणे. २५ ) श्री. रामदास दैठणकर पुणे २६ ) कु. कल्पना अनर्थे वैजापूर. २७ ) श्री. सिताराम अनर्थे वैजापूर. २८ ) पंडित अनर्थे वैजापूर. २९ ) कु. सुनिता ना. विसपूते शिरडी. ३० ) श्री. शशिकांत नागरे जोशी राहाता. ३१ ) श्री. प्रमोद वाइटणा राहता. ३२ ) श्री. ज्ञानेश्वर वाकळे राहाता. ३३ ) श्री. इनुसशेख राहाता. ३४ ) श्री. अहमद पठाण राहाता. ३५ ) कु. वेरुनिका कांबळे राहाता. ३६ ) श्री. बाळासाहेब पाखरे राहाता. ३७) श्री. राव-साहेब देशमुख अमरावती. ३८ ) सौ. निला प्रभू मुंबई. ३९ ) श्री. विष्णू भ. शेजवी भोगे गोवा, ४० ) सौ. गिजरेबाई पुणे. ४१ ) श्री. शामसुंदर मेहा संगमनेर ४२ ) श्री. शाहीर रमेश गोडगे कोपरगाव. ४३ ) श्री. शिवराम बापूराव खंडागळे. कोपरगाव. ४४ ) श्री. पुरुषोत्तम विठ्ठल बावकर मुंबई. ४५) श्री. पुरुषोत्तम कुलकर्णी, अजंठा. ४६) श्री. साहेबराव आनर्थे, वैजापूर ४७) सौ. विमल बाबूराव पुरोहीत शिर्डी. ४८) सौ. पि. गं. कौठणकर नाशिक ४९) श्री. टी. बी. खंडागळे कोपरगाव. ५०) श्री. दिगंबर उद्धवराव भातवडेकर राहाता. ५१) श्री. अशोक जंगम कोपरगाव. ५२) श्री. अंबादास शिवानंद बोरगावकर नांदेड. ५३) श्री. गोरखनाथ श्रीपत बोरडे इंदोर. ५४) श्री. ज्ञानोबा तातू वाडेकर शिर्डी. ५५) श्री. आर. डी. सोनवणे आकोला ५६) श्री. सखाराम राधुजी गुरव कोपरगाव. ५७) श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र वैद्य शिर्डी. ५८) श्री. आदिनाथ तुकाराम भूईगळ सावळी विहीर ५९) श्री. मोहनराव हवलदार संगमनेर. ६०) श्री. राम मदन ढोलक शिर्डी. ६१) श्री. शेख नवाब उमरपटेल अस्तगाव. ६२) श्री. एकनाथ बाजीराव बोडके वैजापूर. ६३) श्री. बादूसिंग सुखराम ठाकूर खामगावकर ६४) श्री. लक्ष्मण शंकर काकडे पिंपळवंडी ६५) श्री. रमाकांत परब गोवा. ६६) श्री. भीमराज धोंडीराम बनसोडे साकुरी. ६७) सुश्री लिलावती कांतीलाल गुजराथी शिर्डी. ६८) श्री. तुकाराम ढोणे अवसरी. ६९) श्री. बाळकृष्ण गंगाधर पेंढारकर मानगाव देवी. ७०) श्री. रमेश बाबूराव वहाडणे राहाता. ७१) संत सखाराम महाराज नाशिक. ७२) श्री. चंद्रकांत कारखानीस बडोदा. ७३) श्री. वसंत दामोदर रासने पुना ७४) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव शिर्डी. ७५) श्री. प्रकाश मिस्तरी शिरसाठ शिर्डी. ७६) श्री. बारावकर काका शिर्डी. ७७) श्री. माणिक बाबूराव साळी शिर्डी. ७८) श्री

रघुनाथ नागरे शिर्डी. ७९) श्री. मुरलीधर तिवारी बाबा शिर्डी. ८०) प्रकाश साऊंड मुंबई. ८१) ह. भ. प. तुकारामबुवा आजेगावकर परभणी ८२) ह. भ. प. भांडार-कवठे महाराज पंढरपूर. ८३) श्री. अजित कडकडे मुंबई. ८४) श्री. वासुदेव चंद्रचुड मुंबई. ८५) श्री. साईनाथ ब्यांकर मुंबई. ८६) श्री. सुरेश आंजर्लेकर मुंबई. ८७) सौ. संकेता आंजर्लेकर मुंबई. ८८) श्री. मारुती मांडवकर मुंबई. ८९) शशीकांत दळवी मुंबई. ९०) विलास पावसकर मुंबई. ९१) श्री. वसंतराव जोशी मुंबई. ९२) श्री. वसंत बी. जाधव मुंबई. ९३) श्री. यशवंत नाईक मुंबई. ९४) श्री. राजाराम कदम मुंबई. ९५ ) श्री. हरीभाऊ वारंगे मुंबई. ९६ ) श्री. सुधाकर वाटे मुंबई. ९७ ) श्री. वसंत कामते मुंबई. ९८ ) श्री. सत्यवान वि. मालाडकर मुंबई. ९९ ) श्री. प्रकाश गोरे मुंबई. १०० ) श्री. नरेंद्र गीध मुंबई. १०१ ) श्री. अनंत वांदोडकर मुंबई. १०२ ) श्री. रोहीदास वर्पे मुंबई. १०३ ) श्री. अभयशेठ मोरे मुंबई, १०४) प्रा. श्री. नरेंद्र विचारे मुंबई. १०५ ) श्री. विलास महाडिक मुंबई. १०६ ) श्री. राजाराम नाचणेकर मुंबई. १०७ ) श्री. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजरवाडीकर तमाशा मंडळ नारायणगाव पुणे. १०८ ) श्री. शांताराम मिराणे शिर्डी. १०९ ) श्री. स्वामी संजयानंद बद्रीनाथ. ११० ) सौ. मिरा संजयानंद बद्रीनाथ.

☆

## — भव्य नेत्रदान शिबीर —

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी व लायन्स क्लबज द्वारा मुंबई, कफ परेड, प्रभादेवी, विलेपार्ले, ( पूर्व, ) कोपरगाव, शिर्डी येथील संस्थानचे श्रीसाई-सरस्वती इमारतीमध्ये दिनांक ७-३-८० ते १६-३-८० पर्यंत भव्य नेत्रशिबीर आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रातील विख्यात डॉक्टर्स श्री. तेलंग, श्री. शिवलकर वगैरेनी डोळ्यातील मोती बिंदूची २०० ऑपरेशन्स केली. साईकृपेने सर्व ऑपरेशन्स यशस्वी झाली. ऑपरेशन काळात संस्थानने रुग्ण व रुग्णांबरोबर आलेल्या माणसांची राहण्याची व भोजनाची चहापाण्याची व्यवस्था विनामूल्य केली होती. जाताना रुग्णांना समारंभपूर्वक निरोप देऊन चष्मे व आवश्यक व संसारोपयोगी वस्तूंची भेट लायन्सतर्फे देण्यात आली.

**हवापाणी:**— शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

०००

# उदी नव्हे–संजीवनी

पवित्र धुनीची पवित्र लाकडें ।
दैवची वेगळे लाकडांचे ।।

असेच काष्ठ मी जरी असतो ।
धन्य झालो असतो, साईस्पर्शे ।।

धुनीमाईची राख, म्हणावा अंगारा ।
कपाळी लावावा प्रेमभरे ।।

धुनीमाईची राख, म्हणावी उदी ।
हाच प्रसाद घ्यावा, त्यागू नये कधी ।।

धुनीमाईची उदी, शिरडीचे ते तिर्थ ।
सुख शांती देते, खोल असे अर्थ ।।

धुनीमाईची उदी, कलीयुगी संजीवनी ।
उद्धरीते भक्तां, कोटी प्रणाम साईचरणी ।।

—डॉ. सौ. मालती रहाटे
शासकीय दवाखाना भंडारा
पो. जि. भंडारा

# श्रीसाई उदी गीत

( चाल : या नवनवल नयनोत्सवा )

ही उदी अमर संजिवनी । लावा हो जनी नेमाने तुम्ही । सौख्याची ती खाणी । ही उदी ।। धृ० ।। दुर्धरहट्टी रोग विखारी । भूत, समंधा भारी, ।। दुर्गुण आपुले उदीच्या संगे, सोडूनि लागती भजनी ।। ही उदी १

—पी. आर. जोशी
१६३, शनवार पेठ
ॐकार वाडा पुणे ३०

## श्रीसाई प्रेरणा

# श्रीबाबांची प्रभावी उदी

लाविता भाळी उदी
सरीती रोग व्याधी
मुखात घालीता उदी
आत्म्यास लाभे शांती
मनात वसे साईमूर्ती
उदी रुपाने आशीर्वाद देती
संकटास धावे माऊली साई
दुःख-संकटात असता भक्त
त्याची रक्षी साईदत्त
देह ठेवूनी श्रीकृष्ण मंदिरी
तीच आपुली पवित्र समाधी
जरी देह ठेविला आपला मंदिरात
तरी साक्षात उभे ठाकतां भक्तांच्या दारात

सदैव वाही काळजी आम्हां भक्तांची
चिंता का करावी आम्ही अभाग्यांनी
हीच विनंती आपुल्या चरणांशी
श्रीदत्त साई सेवकांची
बांधिले श्रीकृष्ण मंदीर शिरडी ग्रामी
त्यात पहुडले आपण घेऊनी समाधी
परी हाक ऐकती भक्तांचे संकटी
धावूनी येती समाधीतूनी
अशी असे बाबांची पवित्र समाधी
अखंड प्रज्वलीत असे देव-अग्नी
तिच पवित्र द्वारकामाई
सदैव हात आपुला असावा आमच्या शिरी
हिच विनंती करतो बाळकृष्ण सेवक
साईदत्त आपुल्या चरणी ॥

—श्री. बाळकृष्ण शामराव गोरक्षकर
६।७४, सोनापूर लेन,
मुं. नं. ४०० ००२.

# ....उदीची चिमुट....

लावीता उदी प्रेमाने
नित्य कपाळास !
साईनाथ सद्‌गुरु माझा
तया सांभाळीत !...

कल्पतरू निश्चित जाणा
साईच्या उदीला
साक्षी ठेऊनी मी वदते

साई द्वारकेला !...

लीन होऊनी चरणाशी
चिमूट घ्या उदीची
फकीर जरी माझे बाबा
रक्षतील तुम्हासी

संजीवनी भस्मामध्ये
साईचे स्वरुप
काम, क्रोध विलया जाऊन
भागते पिशाश्च

लीला म्हणे महिमा थोर
उदी प्रसादाचा
सदोदित लाभे होत
साई अशिषाचा

—सौ. लीला वनगे
हलिमाबाई चाळ, गुप्ते रोड
विष्णुनगर, डोंबिवली ( पश्चिम )

☆ ☆ ☆

# साई उदी लगानेसे

'नमो ॐ श्रीसाई' मन्यसे, मनवा संसार सागर रत जात।
जैसी जा कि भावना, वह वैसाही फल पात ॥१॥
साई नामकी धूनसे, न ठहरे दुःख-भय-कष्ट,।
जा के हृदयमें साई बसे, वो क्योंकर होवे व्यस्त ? ॥२॥
साई है, वही रघुराई है, है वही कृष्ण कन्हाई।
जिस रुपमें तूम दर्शन चाहोगे उस रुपमें वो देई ॥३॥
धन्य है शिरडी नगरी जहां ऐसे संत हूए महान।
जातपात पूछे न कोई, बाबाको लगे सब एक-समान ॥४॥
विविध धर्मके सेवक आते, दर्शन ले ईच्छित फल पाते
धरे भाव जो मनमें जैसे, आत अनुभव उन्हे वैसे ॥५॥
लाख गूणोंकी एक दवा, दो अक्षरका है नाम।
"उदी" तनको लगानेसे मिले तूरंत आराम ॥६॥
हे दत्तावतार श्रीसाई-न ले सकू मैं जो तू देई।
बस मांगू इतनाकी तिहारी कृपा नित्य हमपर होई ॥७॥

—श्री. वामन हातागळे
हरबाजी मंदिरा जवळ टिमकी, नागपूर

# धन्य धन्य झालो साई पावला प्रसाद

दर्शन घडले मजला घालता मी साद
धन्य धन्य झालो साई पावला प्रसाद
अल्प बुद्धीला या माझ्या उमजेना काही
कायीक रूपे घेऊनि येता जादूगार साई
द्रौपदीस दिधली थाळी उणे ना कशाचे
तथापरी उदी-तीर्थ 'परिस' आमुचे
साई नाम जप हेची आम्हासी साधन
दासा मुखी तव नामाची पडू नये वाण
कृपावंता साईनाथा मागणे न काही
दासांच्या या दासाला ठाव द्यावा पायी
दर्शन घडले मजला घालता मी साद
धन्य धन्य झालो साई पावला प्रसाद

—डी. बी. पोतनीस
२६।७ एच. बी. पिंपरी पुणे १७

# आरती साईबाबांची

चाल : ( आरती अवधूता )

आरती साईनाथा ।

जय जय, आरती साईनाथा ॥ धृ० ॥

शिरडी नगरी , समाधि घेऊनी ।

दर्शन दे संता ॥ १ ॥

भेदभाव हा, नसे मंदिरी ।

दावीसी तू जगता ॥ २ ॥

दिवे दिवाळीस, जलांत जळती ।

ऐसी लीला दाविता ॥ ३ ॥

निंबवृक्षा, खाली बैसुनी ।

दाविसि खुण भक्ता ॥ ४ ॥

दुःखेही हरती, उदी लावूनी ।

साऱ्या आरती व्यथा ॥ ५ ॥

सद्‌गुरु माझे, तुम्हीच असूनी ।

ठेवितो चरणी माथा ॥ ६ ॥

—श्री. भालचंद्र बा. ठसाळ
पठाण चाळ, भवानी शंकर रोड,
दादर मुंबई नं. २८

★ ★ ★

# * शिरडी संताची उदी *

संकटकाळी धाऊनी येई साई त्याचे नाम
शिरडी गावच्या संता तुजला लाखो प्रणाम ॥ धृ ॥

कल्याण करण्या मानवाचे फकीर रूप प्रकटले,
डोळे उघडण्या लोकांचे पाण्याचे दिवे लावीले
दुःख संकटे हरण्यासाठी घ्यावे तुमचे नाम
शिरडी गावच्या संता ... ॥ १ ॥

कधी वसती चावडीत कधी असे मशिदीत
भक्तगणांच्या समवेत स्वारी फिरे लेंडी बागेत
तूच अल्ला शंकर भोळा, तुच असे श्रीराम
शिरडी गावच्या संता ... ॥ २ ॥

उदी देऊनी भक्तांचे रोगनिवारण करीसी
वेळोवेळी भक्तांना सन्मार्ग तू दावीसी
हिंदूना करीसी 'सलाम' यवनाना 'रामराम'
शिरडी गावच्या संता ... ॥ ३ ॥

भक्त संकटी जरी असे, देशी त्यांना दृष्टांत
भक्तांच्या मस्तकी असे सदा तुझा वरदहस्त
शिरडी मध्ये दिसती, मजला चारी धाम
शिरडी गावच्या संता ... ॥ ४ ॥

—श्री. ओमप्रकाश बेन्नी
१७४० 'ई' राजारामपुरी ५ वी गल्ली
कोल्हापूर ४१६००१

# तर्ज

आईना वही रहता है ( फिल्म–शालीमार )

साईनाथ को कर जोडो,–जीवन सफल हो जाये
जीवन में होना सफल तो–क्यों न साई के चरण जायें ।। धृ ।।

उदी को ना कहो यारो ऽऽ
वह तो जीवन तारक है ।
श्रद्धा से करलो ग्रहण उसे ऽ
भवरोग भी मिट जाये ।
साई ने तो यही कहा था ऽ
फिर आप क्यों दूर जाये ।।१।।

हम सब तो हैं, एक भाई ऽऽ
ऐसा सबक तू सिखाये ।
'सबका तो मालीक एक है' ऽ
समजो और समझाओ ।
जाओ शरण मेरे भाई ऽऽ
जो, इसे समझ पाये ।।२।।

पाना है तो साई को ऽऽ
क्यों न जाते शिरडी में
मुक्ती मिले वहाँ पर,
शांति मिले दिल में—
पाना अगर उनको तो ऽऽ
जो उसे दिलसे पुकारे ।।३।।

—श्री. अनिल लुतडे
सदस्य श्रीसाईबाबा आरती मंडळ, वर्धा

# साईबाबा सांभाळी

ज्याचा नाही कोणी वाली
साईबाबा त्या सांभाळी ॥

नका करू काही खंत
पाठ राखी साई संत ॥

धरी श्रद्धा आणि सबूरी
साई तयांचा कैवारी ॥

करा मनापासुनि धावा
धाव घेईल तुमच्या गावा ॥

तन मन धन लावा पायी
सदा स्मरा साई साई ॥

—सौ. मालती य. आगाशे
स्युएजप्युरि फिकेशन कार्टर्स,
सेनापति बापट मार्ग, दादर, मुं. २८

# साई दर्शन

(चाल हम चल रहे थे–दो चल रहे थे)

शिरडीस या हो समाधी पहा हो ऽऽ
श्री साई चरणाचे दर्शन घ्या हो ऽऽ शिरडीस –

देव पुत्र या नगरीत वरातीतून हो आला
पाहूनी तयाला म्हणती साई आवो ऽऽ शिरडीस –

जाती–धर्मांचा हो कसला सोडवित गुंता बसला
भाव भक्तिची ही सुमने पायी वहा हो ऽऽ शिरडीस

शिरडीस जे जे आले सारे तयाचे झाले
ह्रदयाशी घेईल तुम्हां पसरोनी बाहो ऽऽऽ शिरडीस

—श्री. अशोक बागवे,
२/२२ वाणी चाळ, शिवडी मुं. १५.

# —जाते माहेराला, जाते माहेराला—

जाते माहेराला जाते माहेराला
साई माऊलींच्या जाते दर्शनाला ॥ धृ ॥

माहेराची वाट फार अवघड
काम क्रोध वैरी तेथे येती आड । जाते माहेराला ॥ १ ॥

साईनाथ नामाचा करूनिया घोष
म्हणून पाहिले साई चरणास । जाते माहेराला ॥ २ ॥.

साई मंदिराचा काय वर्णू थाट
ऊतरले जणु वैकुंठाचे पीठ । जाते माहेराला ॥ ३ ॥

साई माऊलींचे किती वर्णू गुण
जन्म मरणाचा उतरीला शीण । जाते माहेराला ॥ ४ ॥

जड मुढासाठी घेई अवतार
साईनाथ नामाचा छंद लागे थोर । जाते माहेराला ॥ ५ ॥

सदा माझ्या मुखी राहो तुझे नाम
दासी विनविते असे ठेवी प्रेम ॥ ६ ॥

जाते माहेराला जाते माहेराला

—श्रीमती कृष्णाबाई येवलेकर
यादोगोपाळ पेठ, घ. नं. २७४, सातारा

★

# साई, तूच खरा आधार !

तुझ्या कृपेने देवा
होतो भक्तांचा उद्धार
साई तूच खरा आधार !

साद घालता धावत येतो
दुबळयांना तू शक्ति देतो
तव चरणावर माथा टेकून
नमतो मी त्रिवार
साई, तूच खरा आधार

मंगल पावन शिर्डी नगरी
भक्तांना ती वाटे पंढरी
साईसाईचा सदैव तेथे
चाले जयजयकार
साई, तूच खरा आधार

तूच आमुची मायमाऊली
नित्य असू दे तुझी सावली
हीच प्रार्थना तव चरणाशी
करतो वारंवार
साई, तूच खरा आधार

—श्री. सुभाषचंद्र वैष्णव
मु. पो. आंबवडे, ता. भोर (जि. पुणे)

# भगवान श्रीनित्यानंद

[ लेखक–श्री. बाबुराव अर्नाळकर, प्रकाशिका–सौ. इंदिराबाई अर्नाळकर अभ्यंकर बिल्डिंग, स्लेटर रोड, मुंबई ४०००० ७ पाने १८० किंमत १५ रुपये ]

रहस्यकथाकार श्री. बाबुराव अर्नाळकर यांचे नाव महाराष्ट्राला सुपरिचित आहे. १२०० रहस्यकथा लिहून जागतिक विक्रम करणारे बाबुरावजी वृत्तीने मोठे आध्यात्मिक आहेत. त्यांनी यापूर्वी वज्रेश्वरीच्या भगवान श्रीनित्यानंद स्वामीजींचे एक छोटेखानी चरित्र लिहिले होते; पण ते दृष्टी असताना. आता त्यांना दृष्टीहीन अवस्थेत भगवानांची प्रेरणा झाली म्हणून म्हणा; भगवान नित्यानंदाचे सुंदर चरित्र भक्तांच्या हाती दिले आहे. २९ अध्यायी या गद्य चरित्रगाथेत त्यांना भगवान प्रकट झाल्यापासून तो ते समाधिस्थ होईपर्यंतच्या घटना अतिशय प्रासादिक भाषेत कथन केल्या आहेत; त्या वाचताना कुणाही वाचकाचे मन तन्मय होऊन जाते. पुस्तकात बाबांचे अवतार प्रकटीकरण स्थान कान्हनगड व समाधीस्थान गणेशपुरी याबद्दलची सचित्र व अद्यावत माहिती देण्यात आलेली आहे. श्रीनित्यानंदजींच्यावर एक चांगले पुस्तक लिहिल्याबद्दल श्री. अर्नाळकरांचे अभिनंदन.

• • •

# श्रीसाई अमृतानुभव

[ लेखक–श्री. पांडुरंग शंकरराव भुजबळ, प्रकाशिका–सौ. सुलोचना पांडुरंग भुजबळ, ३७७ सोमवार पेठ, सातारा-२, पाने ३६० किं. १५ रु. ]

साताऱ्याचे साईभक्त श्री. पांडुरंगराव भुजबळ यांनी लिहिलेल्या या पुस्तकात एकंदर चार भाग आहेत. पहिल्या भागात त्यांनी आपले वैयक्तिक, कौटुंबिक, जीवनावर साईंना घातलेल्या सात नमस्कारातून आपली आत्म चरित्ररेखा रेखाटली आहे. दुसऱ्या भागात लेखकाला साईभक्तीतून आलेले २७ अनुभव दिलेले आहेत. तिसऱ्या भागात लेखकाच्या सातारा येथील श्रीसाई अध्यात्मिक केंद्रावर येणाऱ्या भक्तांचे एकंदर १०८ अनुभव देण्यात आलेले आहेत तर शेवटच्या चौथ्या भागात बाबांच्या वरील भक्ती प्रेमातून त्यांच्या उदीमुळे भक्तांना आलेले अनेक आश्चर्यकारक व चमत्कारीक अनुभव संग्रहीत करण्यात आलेले आहेत. श्री. भुजबळ यांनी अतिशय घाईने का होईना पण प्रपंच व परमार्थ करून दोन्हीतही यशस्वी होण्यासाठी म्हणून साईभक्तांच्या हाती हा मार्गदर्शक ग्रंथ थोडक्या किंमतीत दिल्याबद्दल त्यांचे खास अभिनंदन. पुस्तकावरील तिरंगी बाबांचे चित्र त्यांचे चिरंजीव श्री. अरुण यांनी चितारलेले असून ते छान आहे.